# ॥ चैतन्य लहरी ॥



सन १९९४-९५ अंक क्र. ११ व १२

# श्री आदिशक्ती पूजा

## प. पू. श्री माताजी निर्मला देवींचे भाषण

### जयपूर १० डिसेंबर १९९४

आपण शक्तीचे पुजारी आहोत, शक्ति-धर्माचे उपासक आहोत; पूर्वी राजे-महाराजेसुद्धां शक्तीचीच आराधना करायचे. प्रत्येकजण आपापल्या देवीला मानतो; या सर्व देवतांना वेगवेगळी नांवे आहेत. जयपूरच्या देवीला गंगौर असं नांव आहे.

आदी-शक्तीनें एकदा राजस्थानमधें अवतार घेतला होता. त्यावेळीं सती-देवी या नावांने हे अवतरण झाले. तिनें खूप जणांना कृपाशीर्वाद दिले आणि राजस्थानी संस्कृतीमधें अजूनही त्याचा प्रत्यय दिसून येतो. पत्नीचा धर्म, पतीचा धर्म, स्त्रीचा धर्म, राजाचा धर्म अशा अनेक धर्मांचे या शक्तीमधून उदात्तीकरण झाले. सती-देवी ही साक्षात गंगौरच होती. तिचे लग्न झाल्यावर एकदां प्रवास करत असतांना त्या मंडळींवर गुंडांनी हल्ला केला आणि त्यातच तिचा पति मारला गेला. त्याच वेळीं ती मेण्यांतून बाहेर आली आणि तिनें आपले स्वरुप प्रगट केलं; आणि सर्व गुडांना ठार मारले. त्यांत तिनें स्वत:लाही अर्पण केले. इथें मुख्य लक्षांत घ्यायची गोष्ट ही की लहानपणापासून लग्न होईपर्यंत तिनें आपलें खरं स्वरूप उघड केलं नाहीं कारण ती महामाया रूपांत होती. आदिशक्तीला महामायेचं रूपच घ्यावं लागते. कारण या जगांत ज्या मोठमोठ्या प्रभावी शक्तींचा अवतार झाला त्या सर्व प्रथम सुरभि, जी गाय होती, म्हणून प्रगटल्या. तिच्यामधें सर्व देव-देवता सामावलेल्या होत्या. त्यानंतर फक्त एकदांच ती राजस्थानमधें आली. माझे पूर्वज चित्तोडमधील सिसोदिया घराण्यातले असल्यामुळें माझं राजस्थानबरोबरचं नाते खूप दिवसांपासूनचे आहे.

आदिशक्तीजवळ अनंत शक्त्या आहेत. तिच्याजवळ नाहीं अशी कोणतीच शक्ती नाही. पण या सर्व शक्ति उघड होत नाहीत. याला दोन कारणें आहेत. एक म्हणजे लोकांना ही आदिशक्ति आहे हे कळलं तर सर्व तऱ्हेचे लोक तिच्यावर हल्ला करतील - कारण असे लोक अगदी दुष्ट, रानटी आणि मागासलेले असतात; ते ईश्वराच्या विरोधी कार्यात मग्न असतात; देवाच्या नावांखाली पैसा कमावण्याच्या मागें असतात. अशा लोकांना आदीशक्तीचा अवतार झाल्याचं समजलं तर ते पळून तरी जातील किंवा त्यांच्यासारखे लोक एकत्र येऊन या कलियुगांत आदिशक्तीच्या कार्यांत अडथळे निर्माण करतील. म्हणून तिला महामायेचं रुप धारण करणें आवश्यक होतं.

दुसरं कारण म्हणजे आजपर्यंत कधींही कुणी केलं नाहीं असं फार मोठं आणि तितकंच सूक्ष्म कार्य या स्वरूपांकडून होणार असतं. म्हणजेच सामूहिक चेतनेचं कार्य. आणि हे होत असतांना कुणालाही कसलाही त्रास न होता घडणार. जणूं तुम्ही बोटीमधें बसून आरामांत पैलतीरावर जाणार असं.

धर्माबद्दल जे लोक सांगत होते ते स्वत: चांगले होते पण ज्यांना त्यांनी ते सांगितलं ते तसे नव्हते. त्यांना खऱ्या अर्थानें धर्म समजलाच नव्हता पण दुसऱ्या लोकांनाही त्यांनी भ्रमांत आणलें. धर्माच्या नावांखाली वाटेल ते घाणेरडे प्रकार होऊ लागले - स्त्रियांवर अत्याचार व छळ, मुलांची हत्या, लूटमार वगैरे विनाशकारी प्रकार.

महामायेजवळ दोष झाकून ठेवण्याची क्षमता पण आहे. ते लपवल्यावर पचवावे पण लागतात. आपण आपले स्वत:मधील दोष काढण्याबद्दल काळजी घेत नाहीं. दुसऱ्यांचे दोष दाखवण्यात मात्र आपण तत्पर असतो. हे अगदीं चूक आहे. महामायेचे अवतरण आणि तिच्या शक्तीचा आविष्कार आपले दोष दूर करण्याकरतांच झाला. ती शक्ति आपल्यामधें सामावल्यावर आपण स्वत:ला व आपल्या शरीराला स्वच्छ करुं शकतो. आश्चर्याची गोष्ट म्हणजे सर्व भोंदू व पछाडलेले गुरु (!) मला ओळखतात. त्यांनीच मला प्रथम कसं ओळखलं मला समजत नाही. कदाचित त्यांचे डोळे दिपून गेले असतील. आदिशक्तीचे आणखी एक रुप म्हणजे महाकाली, जिला पाहिल्यावर तुमची

घाबरगुडीच उडेल. हत्ती आणि घोडे हे पाहूं शकतात. पण इतरांना हे ओळखणं अवघड आहे, इथें किती जण बसून राहतील मलाच कळत नाहीं. हे महाकालीचं रुप धारण करणंही जरुरीचे आहे. जोपर्यंत ही महाकाली-शक्ति प्रगट होत नाहीं तोपर्यंत तुमच्यांतील डाव्या बाजूचे दोष दूर होणार नाहींत. डाव्या बाजूची पकड म्हणजे तुम्ही भुतकाळ आठवत बसता; माझे वडील, त्यांचे वडील असे मोठी व्यक्ति होते वगैरे, आणि त्याच गोष्टी पुन: पुन: आठवत बसता.

आतां मात्र तुम्ही भूतकाळ विसरल्यामुळें नशीबवान ठरला आहात. तरीही मला लोक विचारतात, 'माताजी, मी गेल्या जन्मी कोण होतो?' एक मांणूस तर सारखाच मागे लागला, 'मागच्या जन्मी मी कोण होतो?' मी सांगितलं 'हे बघ बाळा, मी तुझ्याशी बोलत नाहीं म्हणजे कांही तरी बिघडलं आहे. तूं हे मला कशाला विचारतोस? या जन्मांत तूं माझ्याजवळ आहेस हेच खूप नाहीं कां? तूं सारखं मला तुझ्या मागच्या जन्माबद्दल विचारतोस ते कळून तुला काय फायदा?' तो म्हणतो 'मला हे कळायलां हवंच'. मग मी म्हणाले 'ठीक, गेल्या जन्मी तूं जयपूरचा महाराज होतास असं मी सांगितलं तर काय तुला ते सिंहसन वा राज्य मिळणार आहे कां? तूं जर तिकडे गेलास तर लोक तुला घालवून देतील. मग कशाला ह्या मागच्या जन्मीच्या गोष्टी?' परत तो म्हणाला की 'मागच्या जन्मी मी राजा होतो असं एका ज्योतिषाने मला सांगितलं आहे.' मग मी म्हणाले 'तुझ्यांत तर कांही राजेपणाची लक्षणं मला दिसत नाही. त्या ज्योतिषाने पैसे उकळण्याकरतां तुला तसं सांगितलं असेल.'

महाकाली रुप घेतल्याशिवाय असे मूर्ख लोक सुटणार नाहींत. ज्या लोकांच्यात भोंदू गुरुंकडून भुतं शिरलेली असतात त्यांना महाकालीच ठीक करु शकते. ही भुतं अशी असतात की तुम्ही तो गुरु जे सांगेल ते करता; अमक्या घरीं चोरी कर, तमक्याला मारुन टाक वगैरे सर्व कांही त्या गुरुनें सांगितल्याप्रमाणें करत राहता सदैव त्याच्या आज्ञेत.

कलकत्त्याच्या देवीच्या मंदिरात बोकडांचा बळी देतात. देवीसमोरच बोकडाला ठार करतात व त्याच्यांत पछाडलेल्या माणसाच्या अंगातील भूत भरवतात. अशा तऱ्हेनें तो त्रासलेला माणूस बरा होतो. आपण शाकाहारी आहोत म्हणून लिंबू कापतो आणि त्यांना घालवतो. या पछाडलेल्या माणसांच्या मानगुटीवरचे भूत महाकालीला ओळखते; नुसतं तिचं थोडसं रुप पाहताच ते थरथर कापायला लागतात. कुणी लगेच विचारतात की हे असं को होते? आश्चर्याची गोष्ट म्हणजे अहंकारावर हे भूत स्वार झाल्यावर त्या माणसांना महाकाली दिसते.

पुण्यांत एकदां प्रोग्राम चालला होता. कुणी तरी म्हणाले की माताजी ब्राह्मण नसल्यामुळें त्यांचा कार्यक्रम आपल्या इथें होणार नाहीं. तिथले लीडर त्यांना म्हणाले 'ठीक आहे. माताजी ब्राह्मण नाहींत असं आम्ही पेपरांत छापून देतो आणि इथल्याऐवजी दुसरीकडे प्रोग्राम करतो.' ते लोक लगेच तसं नाहीं, तसं नाहीं करावला लागले, आणि मग प्रोग्राम त्याच जागीं झाला. मला कुणी कांहींच हे सांगितलं नव्हतं तरी माझ्या डोक्यांत ते आलं आणि मी सभेंत म्हटलं की जो कोणी ब्राह्मण असेल त्यानें हात माझ्या समोर करावे; लगेच त्यांचे हात थरथर कापायला लागले आणि म्हणूं लागले "माताजी हे सर्व आता थांबवा. तुम्ही साक्षात् शक्ती आहात". मी म्हणाले "पण तुम्ही कापत कां आहात? मी काही तसं सांगितलं नव्हतं. तुम्ही आपणहूनच कापायला लागलात". त्यांना आपण फार मोठे ब्राम्हण आहोत असा अभिमान होता. कुणीतरी म्हणाले "माताजी इकडे पण काही ब्राम्हण लोक बसले आहेत आणि त्यांचे हात पण कापत आहेत". मी म्हणाले की ते ब्राम्हण आहेत का त्यांनाच विचारा. तर ते म्हणू लागले "आम्ही ब्राम्हण नाही. आम्ही वेड्याच्या इस्पितळातून आलेले ठार वेडे आहोत. तिथला एक वेडा तुमच्याकडे आला आणि साफ बरा झाला म्हणून आम्ही पण तुमच्या पायाशी आलो आहोत". मी म्हणाले आतां तुम्हाला समजलं ना? ते पण वेडे आणि तुम्ही पण वेडे. दोघे सारखेच. मग त्यांना सारं लक्षात आलं.

सुरवातीला महाकालीचे प्रगटीकरण वेगवेगळ्या प्रकारे व्हायचे. मला कधी कधी वाटायचं की महाकालीने तिचा प्रभाव कमी केला तर मला इतर काही कार्य करता येईल.

माणसांच्या डाव्या बाजूमधील बिघाडामुळे होणारे सर्व त्रास, दुर्धर मानसिक रोग महाकालीच्या कृपेनेच बरे होतात; म्हणून महाकालीचा मंत्र म्हणणं जरूरीचं आहे. जोपर्यंत महाकालीचं स्मरण होत नाही तोपर्यंत हे आजार बरे होत नाहीत. या लोकांमधून इतकी कमालीची उष्णता बाहेर पडते की मलाच समजेनासं होतं.

महाकालीचं सूक्ष्म स्वरुप तुम्ही पहाल तर ते 'महा-रुद्र' आहे. त्या देवीबद्दल "अति-रुद्र, अति -सौम्य असं संबोधतात". रुद्र-स्वरुप घेतल्याशिवाय त्या बाधा दूर होणार नाहीत. रुद्र रुपाकडूनच त्याचा नाश होणार. एकादशरुद्रांच्या अकरा रुद्रांची शक्ति ही महाकालीच आहे. त्यांचा वास कपाळावरच्या मेंढांमधे असतो, तिथे अकरा चक्र आहेत. एकाद्याला एकादश-रुद्रावर पकड असेल तर त्याला हमखास कॅन्सर किंवा तसलाच दुर्धर रोग आहे हे समजा. सहजयोगाची पध्दत ही शास्त्रीय आणि सर्वांगाने परिपूर्ण आहे. त्यामधे कसलाच दोष सापडणार

नाही.

अलिकडे आता कॅन्सर, एडस् वगैरेचे रोगीसुध्दा येतात आणि सांगतात "माताजी आम्ही कुठल्याही गुरुकडे जात नाही". तुम्ही नसले गेलात तरी तुमच्या आई-वडिलांचा कोणी गुरु असेल.

महाकाली-शक्ति जर या कलियुगात कार्यान्वित झाली नसती तर सहजयोगाच कार्य शक्य झाले नसते. तऱ्हेतऱ्हेच्या या विरोधी शक्तींमुळे चक्रांवर पकड येतेआणि ही चक्रं ठीक केल्याशिवाय कुंडलिनी वर येत नाही. म्हणून या महाकाली स्वरुपाची पूजा करून तिचा आदर करायला हवा. त्याच्यामुळे कुणाला कसलाही त्रास होणार नाही. या नुसत्या रुपामुळे सर्व बाधा दूर जातात.

आजकाल नवरा-बायकोची भांडणं हा एक कठीण प्रश्न झाला आहे. बायका आता शिकलेल्या असतात आणि नवऱ्यांना अडाणी पत्नीच हवी असते. ती तशी नसेल तर काय करायचं ? शहरांत वाढलेली म्हणजे शहरीच होणार - मग लेंगा वापरा वा पॅंट वापरा, कारण मनालाच शहरी वळण असते. शहरांत रुळलेल्या स्त्रियांचे स्त्री-तत्व कमकुवत होते, पुरुषीपणा अधिक तर स्त्रीपणा कमी. स्त्रीचा सर्वांत मोठा गुण म्हणजे विनयशीलता हाच कमी होतो. हा विनय - पावित्र्य - टिकवण्याकरताच राणी पद्मिनीने तीन हजार बायकांसह चितोडच्या किल्ल्यामधे जोहार केला. ती कधी तलवार घेऊन बाहेर पडली नाही; पण तशी वेळ आल्यावर झाशीची राणी पण तलवार पाजळून उभी ठाकली. ती लढाई संपल्यावर इंग्रज सेनाधिकारी जनरल रोस म्हणाला "आम्ही जिंकलो पण झाशीच्या राणीचीच मान उंच झाली". आपल्या देशांत खूप महान, चारित्र्यवान, पतीशी एकरूप झालेल्या आणि स्त्री-धर्माचं उत्तम पालन करणाऱ्या अशा अनेक महिला होऊन गेल्या. त्यांनी आपल्या कुटुंबाचे समजूतदारपणाने पालनपोषण केले. पण महात्मा गांधींनी पुकारल्याबरोबर आपल्या बांगड्यांसकट सर्व दागिने त्यांनी अर्पण केले.

राणा प्रतापची एक गोष्ट आहे. एकदा त्याने एका चित्त्याला आपल्या मुलीजवळची गवतापासून केलेली चपाती पळवून नेतना पाहिले. त्याच्या मनात ते पाहून शंका आली की "मी शत्रूला - अकबरला - शरण न जातां हे काय करीत बसलो आहे ? हा माझा अहंकार तर नाही ना ?". लगेच तो अकबराला पत्र लिहायला बसला. त्याचवेळी त्याच्या क्षत्रिय पत्नीची शक्ति जागृत झाली; तिने हातात भाला घेतला आणि मुलीसमोर येऊन म्हणाली "तुझ्यामुळे याच्या मनात कमकुवतपणा शिरला आहे म्हणून मी तुलाच ठार मारतें". हे सर्व पाहून राणा प्रतापचे डोळे उघडले.

पूर्वी स्त्रिया आपल्या पतीच्या कपाळी तिलक लावून युध्दाकरिता निरोप देत असत. हीच त्यांची शक्ति. पण आज त्यांच्याजवळ शक्तिच उरली नाही आणि पुरुष कमजोर झाले आहेत.

ही शक्ति स्त्रियांना त्यांच्या पावित्र्यांतून मिळते. जोपर्यंत हे पवत्र्य कार्यान्वित होत नाही तोपर्यंत गृहलक्ष्मी शक्तिचा अविष्कार होत नाही. पण ही गृहलक्ष्मी हुशार तर असायलाच पाहिजे शिवाय समजूतदार पण हवी. याचाच अर्थ महाकाली जेव्हां शांत होते तेव्हां ती गृहलक्ष्मी होऊन जाते.

आपण फातिमाबाईला जाणतो. ती महाकालीची शक्ति घेऊन गृहलक्ष्मीच्या सिंहासनावर आरूढ असते. गृहलक्ष्मी आपल्या मुलांना योग्य मार्गापासून दूर होऊ देत नाही. तिचं चारित्र्यं तेजस्वी असते. आपण हे पण जाणतो की अशा तेजस्वी व चारित्र्यवान स्त्रीची निष्ठा व पावित्र्य कुणीही हिरावून घेऊ शकत नाही; कारण तिच्यामध्ये महाकाली शक्ति जागृत असते. अशा स्त्रियांना लोक घाबरतात. पुरुषांनी हे पण समजून घ्यायला हवं की त्यांना कार्यशक्ति स्त्रीकडूनच मिळत असते; असं जर आहे तर ती स्त्री पवित्र व चारित्र्यावान आहे का हे पाहिलं पाहिजे. ती तशी नसेल तर तिला "गप्प बस" म्हणण्याचा अधिकार पुरुषाला आहे. पावित्र्याबरोबर तिच्यामधे अक्कलहुशारी पण हवी, हसतमुख राहण्याची क्षमता असावी, केव्हां व किती हसावं हे पण कळायला हवं. ती अनेक प्रश्नांतून मार्ग काढू शकते कारण तिला सूक्ष्माची जाणीव असते. मी तुम्हाला शरदचंद्राचे वाङ्मय वाचायला सांगीतले आहे. त्यांच्या कादंबऱ्यांतील नायिकांनी प्रपंचातील सर्व खाचाखोचातून सुंदरपणे मार्ग काढले आहेत, हे शहाणपण आहे. आपल्याला राजकारणांत शिरण्याची जरूर नाही, बेकार आर्थिक चर्चा करण्याची जरूर नाही. समाजाला खरं आधिष्ठान स्त्रीच देऊ शकते. जी स्त्री आपलं घर, पति, मुलंबाळं व संसार उत्तम संभाळते तीच कणखर समाज घडवीत असते. भारतांतील अशा कर्तबगार स्त्रियांमुळेच आपला समाज अजून टिकून आहे. तिचा स्वभाव जात्याच आक्रमक नसतो; ती तिच्यामधील पावित्र्यामधूनच सर्व जगाला सांभाळून घेते. ही तिच्यातील देवीचीच शक्ति असते आणि तिचं जीवन देवीसारखं असायला हवं.

महाकाली-शक्तिचं बऱ्याच स्थळांवर कार्य आहे; त्या त्या स्थळांची वाहनं आहेत - ती जेव्हां हत्तीवर आरुढ होते तेव्हां तिला ललिता-गौरी म्हणतात. तिची कळा, कसब, भावना सारं सुंदर आणि आदरणीय आहे. तुम्हाला बुरखा घेण्याची, डोकं

झाकून घेण्याची मुळींच जरुर नाहीं. तुमच्या नजरेंत मात्र पावित्र्य हव. ह्या शब्दाला फार मोठा अर्थ आहे, त्यांत बरंच कांही अंतर्भूत आहे. ती सौम्यस्वरुपी आहेच पण महाकाळी असल्यामुळें जो कोणी तिच्याकडे पापी नजरेनें बघेल तो जळून खाक होईल. म्हणून तिच्यासाठीं नाहीं तर तिच्याकडे वाईट नजरेने पाहणाऱ्याचा नाश होऊं नये म्हणून डोक्यावर वस्त्र घेतात.

महाकालीची शक्ती अशी असते की वरुन ती शांत व तेजस्वी वाटली तरी तिची शक्ती आंतून कार्य करीत असते. लोक म्हणतात महाकाली ही रुद्रशक्ति आहे. तिच्या शक्तीचा प्रभाव आश्चर्यकारक असतो. केवढी ही महामाया ! रुप महाकालीचे पण पाहिलं तर अगदी नम्र, विनयशील, जणु नवविवाहितेसारखी लाजरी आणि बावरी. ती बोलली तर फुलं पडत आहेत असं वाटतं. तुमचा विश्वास बसणार नाहीं. इतकी प्रेमळ. पण ही महाकाली शक्तीच अशी आहे की जिच्याजवळ ती आहे तिच्याजवळपास भूतपण फिरकणार नाहीं; उलट त्यालाच दुसरं भूत पछाडेल. अशी शक्ति असलेल्या स्त्रीच्या एका कटाक्षांत लोक जळून जातील.

दुसरी शक्ती आहे ती महासरस्वती; जिच्यामुळें आपल्या बुद्धीमध्यें अनेक प्रकारच्या कलेबद्दल व निर्मितीबद्दलच्या कल्पना प्रकाशित व साकार होतात. सरस्वतीच्या म्हणजेच शारदेच्या कृपेनें नवीन नवीन विचार सहजपणें शांतपणें स्फुरण पावतात; सुंदर काव्यपंक्ति फुलतात - निराशेच्या नव्हे तर उत्तेजित करणाऱ्या कविता. आपल्या मायभूमिबद्दल खूप राष्ट्रीय कविता लिहिल्या गेल्या पण लोक आतां त्या विसरले आणि त्याऐवजी ही सिनेमांतली कर्कश घाणेरडी गाणीं ऐकू यायला लागली - ते सुद्धां श्रीगणेशांसमोर! जिथें सूज्ञता नाहीं तिथें हे फालतू प्रकार होतात. अशा लोकांच्या डोक्यांतून भलभलत्या कल्पना निघतात. असाच एक माणूस म्हणजे फ्रॉइड (Freud). त्याच्याहून जास्त मूर्ख माणूस मी पाहिला नाहीं. अगदीं निर्लज्जपणें त्यानें आपले विचार सांगितले आणि सर्वांनी त्याला मान्यता दिली ! तुम्ही त्यापैकी नुसती एक ओळ जरी वाचली तरी तो एक निर्लज्ज माणूस नव्हे एक भूत आहे हे तुम्ही जाणाल; त्याने आपली बुध्दी शारदेच्या विरोधी लेखनाकरिता वापरली. मग ते लोण सगळीकडे पसरले - आम्हाला विचार - स्वातंत्र्य आहे म्हणून आम्ही हवं ते लिहिणार ! आजकालचे वर्तमानपत्र चालवणारे पण असेच आहेत. काहींही चित्र - विचित्र कल्पना ते छापतात पण चार चांगल्या गोष्टीबद्दल लिहित नाहीं. कोण मेला, किती मेले इ.!

शारदादेवी सत्याचा साक्षात्कार देते. ती सत्याचे अधिष्ठान आहे. आपल्या बुद्धीमध्यें सत्याचा प्रकाश तिच्याकडून येतो. तुम्ही जेव्हां लिहिता तेव्हां त्या विचारांची शक्ती कोठून येते विचार करा. शारदादेवीकडूनच तुम्हाला ही शक्ति मिळत असते.

आजपर्यंत मी कांही लिखाण केलं नाहीं. आतां मला वाटतं की असं काहीं लिहावं जे सगळ्यांच्या डोक्यात शिरेल. लोकांची डोकी अजून बंदच आहेत. ख्रिस्तांनी कांही लिहिलं नाहीं. महम्मद साहेबांनी पण काहीच लिहिलं नाहीं - त्यांना लिहितां - वाचताच येत नव्हते. शारदादेवीच्या कृपेमधून अनेकांनी विविध लेखन केलं आहे. ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरी आणि इतर ग्रंथ लिहिले. ज्ञानेश्वरीच्या सुरुवातीलाच ते शारदा देवीला वंदन करतात आणि म्हणतात 'माझ्या शब्दांनी शारदादेवी प्रसन्न होणार आहे; जशी पिसं हळुवारपणें तरंगत जमिनीवर पडतात तसे माझे शब्द तुमच्या हृदयापर्यंत पोचूं देत आणि तुमचं हृदय सुगंधित करु देत.' केवढं ज्ञान त्यांनी सहज सांगितले आहे ! त्यांचं काव्य इतकं मधुर, कोमल, आल्हाददायक आहे की वाचणाऱ्याला अमृत प्यायल्यासारखं वाटावं ! विल्यम ब्लेक नावांचा एक इंग्लिश कवि होता; त्याच्या कवितांचे पुस्तक (Visions) - तुम्ही वाचा. त्या कविता इतक्या बोलक्या व हृदय हेलावून टाकणाऱ्या आहेत की त्या वाचल्यावर तुम्हाला स्फुरण व उत्साह येईल. त्याच्या शब्दांतून जणूं शारदादेवी बाहेर येऊन तुमच्या कानांत बोलूं लागते. तुम्ही शरदचंद्र वाचल्यावरही कविता करायला लागाल. भारतामधें असे अनेक प्रतिभासंपन्न लोक होते. टॉलस्टॉय हा पण असाच एक महान लेखक.

दक्षिणेमधे कुरुप नावाचा एक कवि होता. त्याच्या कविता किती सुंदर होत्या सांगू ? राजस्थानला देवीचे खूप आशीर्वाद मिळाले आहेत. तिथे पण मोठमोठे कवी होऊन गेले. अलेक्झांडरसुध्दा तिथल्या संस्कृतीमुळे प्रभावित झाला होता. म्हणून जातांना प्रणाम करुन चांद-वरदाईला घेऊन परतला. चांद-वरदाई मोठा कवी होता आणि राजस्थानी भाषेमध्ये त्याने अलेक्झांडरचं खूप वर्णन केलं आहे. तसाच खुसरो हा एक सूफी होता, कबीरदास, गुरु नानक, रामदास स्वामी - - - - काय एक एक कवि. बंगालमधे पण एकापेक्षा एक मोठ-मोठे कवि. हे सर्व शारदा देवीच्या कृपेतून झालं. शब्दाशब्दांतून धर्म, प्रकाश वाहतोय ! इतके सुंदर शब्द निर्विचारतेतूनच आले.

एका मुस्लिम सज्जन माणसाने विचारलं "माताजी, लोक गझल कां गातात ?" तो पुढं म्हणाला की गझल लिहिणारे सर्व कवि त्यांच्या पत्नीवर प्रेम करत नाहीत पण ते दुसऱ्याच कुठल्या मोहात असतात. मी म्हणाले "तुम्हाला कसं माहीत ?" तर म्हणाला "मी स्वतः पाहिलं आहे आणि ते खरं आहे.

त्यांच्या बायका असूनही त्या रडत असतात. आपली बायको असतांना तिच्याबरोबर राहून सुखात आयुष्य घालवायच्या ऐवजी दुसऱ्याच कुठल्या गोष्टीकरतां हे लोक दुःख करत बसतात". अशा काव्यलेखनाला शारदादेवीचा आशीर्वाद असेल कां ? मग असे लोकही दुसऱ्यांना भ्रमात नेणाऱ्या प्रकारातच मोडतात.

. एका माणसाने दारुबद्दल गाणं म्हटलं. मी म्हणाले हा दारुचा पेला कापत नाही आणि तुम्ही तर थरथरत आहात ! तुम्ही कपापेक्षाही कमजोर. त्यानंतर पुन्हां कधी दारुबद्दल तो बोलला नाही. त्याची पत्नी वारली तेव्हां त्याने तिच्यावर एक कविता लिहिली ; पंधरा दिवसातच त्याने दुसरं लग्न केलं आणि त्या नवीन पत्नीवर आणखी एक कविता लिहिली. अशा तऱ्हेचे अनेक फुटकळ कवी आपल्याकडे आहेत , विशेषतः असे की जे प्रत्येक गोष्टीमधे देवाचं नाव आणतात. हा मि. एस्. पहा ; तो राधा-कृष्णाचं कसलं प्रेमी - युगुलासारखं चित्र काढतो आहे कळत नाही. कृष्णाला - ज्याला साऱ्या विश्वाची काळजी - असले चाळे करायला वेळ होता कां ? राधा - 'रा' म्हणजे शक्ति , 'धा' म्हणजे धारण करणारी - तिला पण असा रिकामटेकडा उद्योग करायला वेळ असतो कां ?

झेन कवींनी लिहिलेली कविता सहजयोगी लोकांनाच समजतील. ते कुठल्याही वस्तूचं , तिच्या बारीक सारीक खुब्यांचं सुंदर वर्णन करतात आणि सुंदर चित्रातून ते दाखवतात हे फक्त योगीच ओळखू शकतात. आजकाल मुजरामधे पण कव्वाली म्हणतात. हे असं शारदादेवीकडून होणारच नाही. संगीतसुध्दा शुध्द हवं , त्यात भेसळ नसावी. ज्यांना असं शुध्द संगीत काय हे समजत नाही तेच लोक असे सरमिसळ करण्याचे प्रकार करतात. खेडेगावातल्या लोकांच गाणं , शारदादेवीची पूर्ण कृपा झाल्यामुळं फार मधुर असते. शारदादेवीच्या कृपेतूनच मोठमोठे ग्रंथ निर्माण झाले , तसेच प्रसिध्द व नावाजलेली नाटकं आणि कादंबऱ्या लिहिल्या गेल्या. आजकाल मात्र शारदादेवीने आपला हात आखडला आहे व कृपा कमी केली आहे असं वाटतं. या राजस्थानमधे कलेमधे आता खूपच प्रगती झाली आहे , गेल्या दोन-तीन वर्षात तर ती बहरून आली आहे. ही फक्त शारदादेवीचीच कृपा आहे ; त्याबद्दल शंकाच नको. आपल्या हातांनी पण हे लोक कलाकुसरीच्या सुंदर वस्तू बनवतात. ही कला त्यांच्याजवळ पूर्वी पण होती. लोकांनी त्यांचं कौतुक केले. साध्यासुध्या मातीच्या भांड्यातही कलाकुसर आहे व रंगसंगती आहे. राजस्थानांतले लोकांचे कपडे पण रंगीबेरंगी असतात. त्यांना त्याचं काही वाटत नाही. पाश्चात्य लोक असे नसतात. ते म्हणतात की कपड्याला बॉर्डर असली तर त्याच्यावर आणखी डिझाईन नको - ती वेगळीच दिसली पाहिजे. हे व्हायला कारण म्हणजे मेंदूचा हृदयाशी काही संबंध नसतो. मेंदू आणि हृदय एकरूप झाले की मगच लोकांना आनंदाचा वर्षाव म्हणजे काय हे समजू लागतो ; त्या आनंदातूनच रंग निर्माण होतात व ते सगळीकडे पसरतात. ही रंगांची होळी फक्त आपल्या देशातच होते , इतरत्र नाही. सुंदर रंगांची ही उधळण असते ; तीच रंगीबेरंगी साड्यामधून व्यक्त होते. पाश्चिमात्य देशांत फक्त करड्या रंगाचे कपडे घालतात , ते नाही तर काळ्या रंगाचे कपडे. ते लोक अशी एकादी साडी तरी बनवू शकतात कां ?

एक गोष्ट मात्र मला सांगायला हवी ती म्हणजे स्वच्छतेकडे आपण कमी लक्ष देतो. इथल्या बायका स्वच्छ राहतात , घर स्वच्छ ठेवतात पण बाहेर मात्र कमालीची घाण. इथले पुरुषही घराबाहेरच्या स्वच्छतेकडे लक्ष देत नाहीत ; सगळीकडे घाण व कचरा. पाश्चिमात्य लोक बाहेरची जागा पण स्वच्छ ठेवतात. त्यांना ती आवडच असते. स्वच्छता आणि परिपूर्णता हे सुध्दा शारदादेवीचे आशीर्वाद आहेत. जर अशी घाण असेल तर त्या ठिकाणी शारदादेवी कशी येणार ? ही स्वच्छताही नीटसपणे व प्रयत्नपूर्वक जाणीवेमुळे होऊ शकते. शारदादेवीची शक्ति अपार आहे ; तिच्या कृपेला सीमा नाही.

भारतातील स्त्रिया अजून तरी त्यांचे संस्कार विसरल्या नाहीत. ज्या वेळेस त्यांचं चारित्र्य , विनय , पावित्र्य संपेल त्यावेळेसच त्यांच्या अंतरंगातील - त्यांची कला , त्यांच स्त्री-पत्नी-माता-स्वरुप सर्व शुध्दता लयाला जाईल. शारदादेवीच्या कृपेत असणाऱ्या सर्वांनी हे लक्षात ठेवले पाहिजे. असं म्हणतात "कला पड्याआड ठेवणे हीच कला". तुम्ही जे काय करता त्यांच प्रदर्शन करण्याची जरूर नाही. पण शारदादेवीचे पूर्ण आशीर्वाद हवे असतील तर तुम्ही जे काय करता , तुमचे कपडेलत्तेसुध्दा , सर्व दुसऱ्यांकरिता असावं , स्वतःकरिता नसावे. दुसऱ्याची नजर खेचून घेण्याकरता काही करायला नको - आजकाल सिनेतारकांची नांव रस्त्यावरची माणसं असल्यासारखे घेतलं जाते. कुणाला त्यांच्याबद्दल आदर नसतो. जीवनातील प्रत्येक गोष्टीला शारदादेवीचं आधिष्ठान असावं.

तुम्हाला जर शारदादेवीचे आशीर्वाद हवे असतील तर तुमच्या खेड्यातील , देशातील सर्व कलाकारांचा आणि त्यांच्या कलेचा आदर करायला शिका.

आतां नाट्यकलेबद्दल. बंगाल आणि महाराष्ट्रात लोकांना सिनेमाऐवजी नाटक पहाणं आवडते. पण आजकाल नाटकांचा दर्जा खालावला आहे. पुढं आणखी काय होणार आहे समजत नाही. मी तर इतके विचित्र प्रकार पाहिले आहेत की शारदादेवी इथून दूर निघून जाईल. आता आणखी काय घाणेरडे प्रकार सिनेमांत होणार आहेत कुणास ठाऊक. माझ्या हयातीत जर ही

घाण दूर झाली तर मला आनंद होईल.

भारतीय कला फार सुंदर, कोमल आहे. चिनी लोकांची कला सिंहासारखी आहे; ईजिप्तमधे असे रंग वापरतात की त्यांच्या चित्रांतली माणसे उभे असली तरी मेलेली वाटतात. इंग्लंड आणि अमेरिकेत लोक जोपर्यंत वास्तववादी होते तोपर्यंत त्यांनी चांगली कला निर्माण केली, नंतर ते थोडे दिखाऊ वृत्तीचे झाले तरी त्यांची कला टिकून होती. पण आजकाल मॉडर्न आर्टच्या नावांखाली चालते ते मला किंवा तुम्हाला समजण्यासारखे नाही. कलेचा दर्जाच इतका खालावला आहे की शारदादेवी इथून फार दूर गेली असली पाहिजे. आश्चर्य म्हणजे जितके घाणेरडे, अधार्मिक व चुकीचे चित्रपट बनतात तितके ते जास्त खपतात !

तुम्हा सर्व सहजयोग्यांना कलेचं ज्ञान हवं व कलेला, विशेषतः हस्तकौशल्याला प्रोत्साहन द्यायला हवं. म्हणजे पर्यावरणाचा प्रश्न पण सुटेल. घरांमधे पण पंचवीस प्लॅस्टीक वस्तू वा चाळीस कागदी प्लेटस् ! एकाद-दुसरी सुबक वस्तु असणं चांगलं. हीच आपली भारतीय संस्कृती आहे आणि इथे प्रत्येक परिमाणूला, पेशीला शारदेकडून प्रकाश मिळाला आहे. स्त्रियांनी ही संस्कृती सांभाळली आहे पण आतां पुरुषांनी पण ती समजून घ्याला हवी. तुम्ही नृत्य वा संगीताच्या शुध्द नादामधे येता तेव्हां शारदेवीचे आशीर्वाद मिळत असतात. मी बरेच वेळां पाहिलं आहे की जे कलाकार माझ्यासमोर संगीत वा नृत्य सादर करतात ते फार लवकर प्रसिध्दीला येतात. त्यांची कला लोकांना आवडते व ते जास्तच पारंगत होतात. अर्थात शारदेच्या कृपेनेच हे होत असते.

आपल्यामधे असणारी तिसरी सक्ति म्हणजे त्रिगुणात्मक शक्ति. ही महालक्ष्मीची शक्ति आहे. महालक्ष्मीची पूजा करण्याचा अधिकार ज्यांना लक्ष्मीचे पुरेपूर आशीर्वाद मिळाले आहेत त्यांनाच आहे. ज्याच्यामुळे आपण साधक बनतो ती महालक्ष्मीचीच शक्ति. कोल्हापूरमधे स्वयंभू महालक्ष्मीचे मंदिर आहे. तिथे लोक देवीसमोर जोगवा गातात व म्हणतात 'उदे-उदे अंबे' हे गीत नामदेवांनी सोळाव्या शतकांत लिहिले. मी तिथल्या ब्राम्हणांना विचारलं की महालक्ष्मीसमोर तुम्ही अंबा-देवीचे हे गाणं कां म्हणतां तर ते म्हणाले "आम्हाला ते माहीत नाही पण नामदेवांच्या काळापासून असंख्य वेळा ही पध्दत चालली आहे". मग ही अंबा कोण ? ते म्हणाले "अंबा ही सुध्दा देवीच नाही कां ?" मी म्हणाले "तुम्हाला एवढंच माहीत आहे; ते फार अवघड असल्यामुळे मला तुम्हाला समजावून सांगता येणार नाही". ही अंबा महालक्ष्मीच्या मंदिरातच जागृत होते हे कसं होते ? आपली मध्य नाडी (सुषुम्ना) ही महालक्ष्मीची आहे, या मार्गावर तुमच्या डाव्या वा उजव्या बाजूचे होणे आणि बुध्दीचं काम सर्व थंड होते आणि तुम्ही मधल्या स्थितीवर येता. यावेळी तुम्ही जे शोधता त्याला महालक्ष्मीचा आशीर्वाद मिळतो. यालाच बायबलमध्ये उध्दारकर्ता असं संबोधलं आहे. ख्रिस्तांनी तीन प्रकार सांगितले. पहिला म्हणजे आरामदायी (Comforter) - हा डाव्या बाजुला, दुसरा उपदेशकार (Counsellor) हा उजव्या बाजुला आणि मध्य मार्गातला उध्दारक (Redeemer). हेच बायबलमधील Holy Ghost चे तीन गुण. तुम्ही जेव्हा मध्य मार्गामधे येऊन राहता तेव्हा तुम्ही खरे साधक होता आणि मग महालक्ष्मीचे सर्व आशीर्वाद तुम्हाला मिळतात. महालक्ष्मीच्या या मध्य मार्गामधे उत्क्रांत होणं फार अवघड आहे. कारण आपल मन कधी डाव्या बाजूला तर कधी उजव्या बाजूला झुकत राहतं, फक्त कुंडलिनीच्या जागरणानंतरच तुम्ही मध्य मार्गात स्थापित होऊ शकतां. प्रथम ती तुम्हाला भवसागरातुन पार करते आणि पुढे टाळूवरील ब्रम्हरंध्र उघडून परमात्म्याशी भिडते. (ब्रम्हांड) त्यानंतर त्रिगुणात्मक एकत्रितपणे तुम्हाला मदत करते. आज्ञाचक्र पार झाल्यावर तुम्ही महामायेजवळ येता. 'सहस्त्र महामयी'. असं सांगितले आहे की सहस्त्रार उघडण्याच्या वेळेस ती महामायेचं रूप धारण करते आणि ते रुप जाणण्याचा जास्त जास्त प्रयत्न करता करता तुम्ही सूक्ष्म, अतिसूक्ष्म, तरलसूक्ष्म अशा वरवरच्या स्थितीमधे जाता. इतकी सूक्ष्मता मिळवणं जरूरीचं आहे. आपल्या अंतरंगात जे आहे - जे विशेष आहे, मौल्यवान आहे, अभिमान वाटावा असं आहे - ते जाणण्याकरतां सूक्ष्मातच उतरायला पाहिजे. त्याच्या आड येणारी गोष्ट म्हणजेच आपल्या डाव्या किंवा उजव्या बाजूचा जोर (प्रभाव). त्यासाठीच तुम्ही स्वतःकडे पहायला हवं., आत्मपरीक्षण करायला हवं - दुसऱ्यांचं नव्हे तर स्वतःचं. हे सर्व करत असताना तुम्ही सहजयोगात प्रस्थापित व्हाल.

जोपर्यंत साधक या स्थितीला येत नाही तोपर्यंत त्याची तळमळ होत असते, नाही तर माझं हे बोलणं नुसते शब्दच राहतील. या स्थितीला प्राप्त केल्यानंतरही ती शक्ति वापरली पाहिजे, नाही तर ही श्रध्दा दृढ होत नाही आणि नंतर निर्विकल्प समाधि अवस्था मिळवायला वेळ लागतो.

आजचं माझं भाषण फार लांबलं कारण विषयच तसा होता. त्रिगुणात्मक अशा तीन शक्तींबद्दल सांगितले पण आदिशक्ति ही त्याच्याही पलीकडे आहे. तिच्याबद्दल सांगणे सोपं नाही. ती फार मोठी विशेष शक्ति आहे. तिचं वर्णन करणंही फार अवघड. मी नव्हे तर तुम्हीच ते करू शकाल. ते काम मी तुमच्यावर सोपवते.

परमेश्वराचे सर्वांना अनंत आशीर्वाद.

# ईस्टर पूजा

## प. पू. श्री माताजी निर्मला देवींचे भाषण

## कलकत्ता, एप्रिल १५ (सारांश)

ईस्टर हा फार अर्थपूर्ण दिवस आहे; फक्त ख्रिस्तांसाठी नाही पण आपल्या सर्वांसाठी. कारण सर्वात महत्वाचा दिवस म्हणजे जेव्हा पुनरुध्दार होतो. ख्रिस्तांचे पुनरूथ्यान हा ख्रिस्तनीतीचा संदेश आहे, क्रॉसचा नव्हे. पुनरूथ्यान करून ख्रिस्तांनी दाखवून दिलं की तुमच्या या शरीरासकट पुनरूथ्यान शक्य आहे. आणि याच्याशिवाय आज्ञाचक्राच्या पार होणे शक्य नव्हते. त्यांचं आयुष्य फारच कमी होतं यावद्दल शंका नाही आणि एका अर्थाने ते साडेतीन वर्षच होते असं आपण म्हणू शकतो. ते भारतात आले आणि शालीवाहनची व त्यांची भेट झाली. शालीवाहनने त्यांचं नांव विचारल्यावर ते म्हणाले माझं नांव "ईशामशी" आणि पुढे म्हणाले "मी म्लेंच्छ लोकांच्या देशांतून आलो, म्लेंच्छ (मल-इच्छा) म्हणजे वाईट इच्छा, अशुध्द व मलीन इच्छा. म्हणून त्या देशात कसं रहायचं ? आता हाच माझा देश". पण शालीवाहनने त्याला परत स्वदेशात जाऊन तिथल्या लोकांना वाचवायला आणि त्यांना "परम निर्मल तत्व सांगायला सांगीतले". मग तो परत आपल्या देशात गेला आणि अवघ्या साडेतीन वर्षात त्याला सुळावर जावं लागलं.

मरतेसमयी त्यांनी 'क्षमे' बद्दल खुप सुंदर गोष्टी सांगीतल्या पण सरतेशेवटी ते म्हणाले "माता आली आहे पहा". म्हणजे तुम्ही आईची वाट पहा. तसंच हयात असताना ते असंही म्हणाले "मी तुमच्यासाठी होली घोस्ट (Holy Ghost) पाठवणार आहे जे तुम्हाला आराम देईल, उपदेश करेल आणि तुमचा उध्दार करेल म्हणजेच तुमचं पुनरूथ्यान होईल. ते हे सर्व म्हणाले कारण त्यांना पुढं काय व कसं होणार आहे हे सर्व माहीत होते. ते असंही म्हणाले की "माझ्याबद्दल तुम्ही काहीही बोललात किंवा माझ्या विरोधात काहीही केलंत तरी चालेल पण होली घोस्टच्या विरुध्द तुम्ही गेलात तर ते मी कदापी सहन करणार नाही; काय वाटेल ते झालं तरी ते चालू देणार नाही". आणि हे खरंही आहे, होली घोस्टच्या विरोधात जाणं फारच धोकादायक आहे. याबद्दल काहीही शंका नको. माझ्याकडून तशी भिती नाही, पण या देशात देवता मात्र तितक्याच रागीट आहेत.

सहजयोगामध्ये तुमच्या शरीरासकट तुमचं पुनरूथ्यान झालं आहे. यापूर्वी तुम्ही परमात्म्याच्या सर्वव्यापी शक्तीबरोबर जोडले गेला नव्हता आणि तुम्ही जे काही करत होता ते मनाने वा भावनेने करत होता. तुम्ही तुमच्या भावना, इच्छा, कर्तृत्व व अहंकार यामधे डुबुन गेला होता. आत्मसाक्षात्कारानंतर तुम्ही किती स्वतंत्र, मुक्त आहात ते तुम्हालाच जाणवलं आहे, तुमचं सारं व्यक्तिमत्व उन्नत झालं आहे. ख्रिस्तांनी अनेक उदाहरणांतुन हेच सांगीतलं आहे की तुम्ही "स्वतःला ओळखा". तुम्ही स्वतःला ओळखल्याशिवाय तुमचं पुनरूथ्यान होणार नाही हे त्यांना माहीत होते. पण सहजयोग याच्या अगदी उलट आहे. तुमचा आधी पुनरुद्धार होतो आणि मग तुम्ही स्वतःला ओळखता. ही साक्षात्कार होण्याची अगदी सहज व सुंदर क्रिया आहे.

ख्रिस्तांचं जीवन पाहिलं तर कळून येते की ते पुटपुटणाऱ्या आत्म्यांबद्दल सांगत असायचे. सहजयोगतही तो सर्वांसाठी खुला असल्यामुळे, अनेक प्रकारचे लोक आले आहेत. सहजयोगांतही काही उथळ वृत्तीचे लेक आले आहेत आणि ते सहजयोगाबद्दल वाफ्फळ बडबड करून किंवा सहजयोगाच्या कार्याबद्दल नसती बडबड करून या उथळपणाचं प्रदर्शन करत असतात. त्याला इलाज नव्हता पण ख्रिस्त म्हणाले होते की या पुटपुटणाऱ्या आत्म्यांबद्दल तुम्ही जागरूक राहिलं पाहिजे. याच गोष्टीची आपण फार काळजी घेतली पाहिजे. तुम्ही सहजयोगांत नवीन असता तेव्हा तुम्ही अशा लोकांच्या कह्यांत जाण्याची शक्यता असते कारण ते एक प्रकारे असं म्हणू या, विरोधी शक्तीचे संदेशवाहक असतात. अशा लोकांना तुम्ही शोधून काढायचा प्रयत्न केला पाहिजे. ते कशाना कशाबद्दल नेहमी कुरकुर करत असतात, उथळपणाच्या गप्पा मारत असतात आणि तुमच्या जेव्हा असले प्रकार नजरेस पडतात तेव्हा तुम्ही त्यांच्यापासून दूर राहिलेलंच बरं. कारण नुसतं तुमचं पुनरुथ्यान झाल्यानं तुम्ही काही मिळवत नाही. पुनरुथ्यान झाल्यावर, म्हणजे साक्षात्कार मिळाल्यावर तुम्हाला गहनतेत उतरून प्रगल्भ व्हायचं आहे आणि

ती गहनता मिळवण्यासाठी आपल्यावर अशा लोकांचा कसा प्रभाव पडतो, ज्यांना मला वाटतं कुचकामी म्हणावे, इकडे आपण फार लक्ष ठेवले पाहिजे. याच्यामधून पार पडून जे पुढे येतात ते जणू सुंदर देवदूत बनतात. याबद्दल काहीच शंका नाही, पण लक्षात ठेवायची मुख्य गोष्ट म्हणजे तुम्हाला मिळालेल्या आत्मसाक्षात्काराचा तुम्ही आदर राखला पाहिजे. दुसरे लोक काय बोलतात, काय म्हणतात, कशाबद्दल टिका करतात वगैरेची काळजी नकरता तुम्ही स्वतःकडेच पहायची सवय करा आणि या गहनतेमधूनच पुढची वाटचाल करत रहा.

तुमचा पुनरुध्दार होण्याची फार महान संधी या जन्मात तुम्हाला मिळाली आहे आणि तुम्हाला माहीतच आहे की हाच उत्क्रान्तीचा शेवटचा टप्पा आहे. आता तुम्ही मन बाजूला ठेवा कारण मनाच्या व्यापारामध्येच रहाल तर तुम्ही मनाच्या पलीकडे जाऊ शकणार नाही; सहजयोगाची प्रगती ही मनाचं काम थांबवल्यावरच होणार आहे. मगच तुम्ही स्वतःला ओळखू शकाल, कारण तुम्हाला आत्म्याचं ज्ञान झालेले असते; तुमची चक्रे तुम्हीच जाणू शकतां, दुसऱ्याची चक्रेपण जाणू शकतां. हे सर्व ज्ञान तुमच्याजवळ उपलब्ध आहे पण तुम्ही सतत सूक्ष्म, सूक्ष्मतर व्हायला पाहिजे, जड मानव नव्हे. अशी सूक्ष्मता जशी अंगी बाणेल तसतशी तुमची अंगशक्ति वृध्दिंगत होईल आणि तिचा तऱ्हेतऱ्हेचा आविष्कार पाहिल्यावर तुम्ही थक्क व्हाल.

सहजयोगामधे काही लोक महत्वाकांक्षी असल्याचं मी पाहिलं आहे. ते म्हणू लागतात की माताजी आम्हाला परमेश्वराचा साक्षात्कार हवा आहे, मला हे करायचं आहे, ते करायचं आहे. इथे काही ऑफिसचा कारभार चालला नाही म्हणून अमक्याला बढती वगैरे प्रकार नाहीत, तर तुम्हालाच तुमची प्रगती करायची आहे. नाही तर मग ते म्णू लागतात मी अमुक आहे, तमुक आहे इ. आम्ही त्यांना 'महायोगी' म्हणतो. कुणी म्हणतात की ते फार मोठे झाले आहेत आणि शेवटी वेड्याच्या इस्पितळात जातात ! असे म्हणणारे लोक आढळले तर तुम्ही त्यांना गप्प करा आणि टाळा. त्यांच्याबरोबर राहणारे काही लोक असतातच म्हणा. म्हणून तुम्ही लक्षांत ठेवायचं हे की आतां शेवटचा निर्णय होणार आहे आणि फार मोठी गाळणी सुरु झाली आहे, निवड करण्याचं मोठं काम सुरु झालं आहे. जे गहन व सूक्ष्म आहेत ते अधिकाधिक गहनतेत उतरत आहेत आणि जे उथळ, मूर्ख, विचित्र आणि जड आहेत ते बाहेर फेकले जात आहेत. अशी ही गाळण फार भराभर चालली आहे आणि ते चालू असतानाच आपण कुठे आहोत हे आपल्याला समजून घ्यायचं आहे.

आतां हे कसं ओळखायचं ? प्रथम म्हणजे तुमची करूणा; तुमच्या करुणेमधे विवेक असायला हवा. कधी कधी लोकांना अयोग्य (Negative) लोकांबद्दल चुकीची करुणा येते. सहजयोगात आल्यानंतर कुणाबद्दल करूणा वाटायला हवी हे तुम्हाला समजलं पाहिजे. व्हायब्रेशन्समधून हे समजणं अगदी सोपं आहे. समोरचा माणूस कसा आहे हे समजून घ्या, त्यासाठी तुम्हाला चैतन्यलहरींची जाणीव हवी. अशी जाणीव नसेल तर खरं काय आणि खोटं काय हे तुम्हाला समजणारच नाही. म्हणून तुम्ही सर्वांनी नियमितपणे ध्यान केलं पाहिजे. स्वतःलाच दोष न देता तुम्ही नियमितपणे ध्यान करू शकता. हे फार महत्वाचं आहे. कोण ध्यान करतो आणि कोण करत नाही हे मला लगेचच्या लगेच कळते. अगदी क्षणभरांत ! जो नियमीत ध्यान करतो तो अगदी देवदूतासारखा असतो; त्या व्यक्तींचं सर्व वागणं, सारया प्रतिक्रिया, त्याचा दृष्टिकोन या सर्वांमधून प्रगल्भ दिव्यत्व प्रत्ययाला येत असते. आणि तुम्ही चकीत होऊन जाता ! "सहस्त्रारांतली महामाया" तुम्ही जाणतां. मला ओळखणं फार कठीण आहे. एखाद्या वेळी तुम्ही "मी कोण आहे हे कदाचित् ओळखू शकाल पण क्षणभरांतच ते विसराल. ही किमया आहे. कारण तुम्ही जर मला पूर्णपणे ओळखू शकला असता तर तुम्ही इथे बसणारच नाही; माझ्या जवळही यायला तुम्ही धजावणार नाही. म्हणून ही महामाया सदोदित कार्य करत असते. पण त्याच्यामुळेच लोकांचं खरं स्वरुप कळून येते.

शेवटचा निर्णय ही काही सोपी गोष्ट नाही ! हजार न्यायाधीश जरी एकत्र आले तरी ते असा निकाल देऊ शकणार नाहीत. काय खरं आहे हे तुम्ही सर्वकाळी समजून घ्यायला हवं. काहीही झालं तरी मला सारं काही कळत असते पण मी मला हे ठाऊक आहे असं कधीच दर्शवणार नाही. अशा तऱ्हेने मी सारं काही करत असते आणि एखाद्या माणसाचं काय करायचं ते हळूहळू मला समजते.

तुमच्या या पुनरूध्दाराला ख्रिस्तापेक्षाही फार मोठे आशिर्वाद मिळाले आहेत. ते एकटेच होते आणि लोक त्यांना ओळखू शकले नाहीत. त्यांच्या हातावर आणि पायावर जिथे-जिथे खिळे मारले गेले त्या खुणा त्यांना दाखवून द्यायच्या होत्या. पण आता तशी परीस्थिती नाही. एकच गोष्ट म्हणजे पहिल्या प्रथम तुम्ही मला ओळखायला हवं, बस्. मी कोण हे समजण्याची जरूर नाही, ती फार अवघड गोष्ट आहे. मला समजणं अवघड आहे पण मला ओळखलं की सारं मिळालं ! आणि हे सर्व तुमच्या संवेदन-क्षमतेवर असवलंबून आहे. तुमचं पुनरूथ्थान पूर्णपणे व्हायला हवं आणि सहजयोगांत तुम्ही प्रगल्भ व्हायला हवं. अशी प्रगल्भता तुम्ही मिळवली नाही तर मी म्हणेन तुम्ही सहजयोग सोडून द्या. काही काळ बाहेर रहा, मग तुम्हाला हे सर्व काय चाललं आहे ते उमजेल आणि तुम्ही परत याल.

ख्रिस्तांनी आपल्या आयुष्याचं समर्पण केलं तसं सहजयोग तुम्हाला तुमच्या आयुष्याचा त्याग करायला सांगत नाही. तुमच्या आईला पण तसं काही नको, पण तरीही तुम्हाला काही त्याग करायला हवा, उदा. गणपतीपुळेला आल्यावर कधी कधी असमाधानकारक किंवा कमी सोयीच्या जागेत रहावं लागतं, प्रवास करताना बराच त्रास सहन करावा लागतो किंवा स्वतःच्या घरातल्यासारखा आराम इथे मिळत नाही वगैरे. पण त्याहून महत्वाचा त्याग म्हणजे तुमच्यातील अहंकाराचा, या अहंकाराला

सुळावर द्यायचं. या अहंकारामुळेच तुम्हाला नसत्या कल्पना सुचतात. हा अहंकार जर अर्पण केला तर तुम्हालाच खूप मदत होईल. पण नुसत्या त्याला अर्पण करण्याबद्दलच विचार करत बसलात तर तुमची मनःशक्तीच फक्त खर्च होत राहील. अशा तऱ्हेच्या सर्व गोष्टी तुमच्या मनाचेच खेळ असतात आणि त्यांतूनच तुमच्यातील अहंकाराचा वापर होत राहतो. म्हणून सर्वांत उत्तम उपाय म्हणजे ध्यान करणे, निर्विचारतेच्या जाणीवेमधे जाणे; त्यापासून आपोआप तुम्ही समर्पित बनू लागता.

आतां मला तुमच्याकडून काय हवं आहे ? काहींच नाही. मला कशाचीही जरूरी नाही, मला स्वतःकरतां काहींच नकोय्. तुम्हीच मला हे देता, ते देता. मला त्या सर्व गोष्टींपासुन दूर जावंसं वाटतं. फक्त तुमच्या समाधानाकरतां मी ते मान्य करते. मला स्वतःसाठी सहजयोग करायची जरूरी नाही पण हे सारं तुमच्या आईचं प्रेम आहे, तिला या पृथ्वीवरील जास्तीत जास्त माणसांना तारायचं आहे; त्यांचं पुनरूथ्यान करायचं आहे. हा एक विशेष समय आहे आणि तुमच्याद्वारेच मला हे कार्य करायचं आहे. तुम्ही सगळीकडे जाऊन सहजयोगाचा प्रचार व प्रसार करायला लागा आणि त्या कामासाठी इतरांना पण तयार व्हायला मदत करा.

आजचा दिवस प्रतिज्ञा करण्याचा आहे, प्रतिज्ञा स्वतःलाच वचन देऊन करायची की आम्ही सहजयोगात उत्तरोत्तर वृध्दिंगत होऊ, जेणेकरून सहजयोगाबद्दलच्या आमच्या भावना, ज्ञान आणि संवेदनशीलता गहन होतील; त्याक्षमतेसाठी मी रोज ध्यान करेन. ही फार महत्वाची गोष्ट आहे.

दुसरी गोष्ट म्हणजे लोक म्हणतात की इथले लोक फार कंजूष आहेत. ते हे करायला तयार नाहीत, ह्याला पैसे द्यायला, ते विकत घ्यायला तयार नसतात. मला वाटतं की तुमचं प्रेम तुमच्या औदार्यामधून व्यक्त होत असते. तुम्ही मला काही तरी घाल, ते ठीक आहे, पण जेव्हां पैसे मोजायचा प्रश्न येतो तेव्हां मी खर्च करते किंवा दुसरा कोणीतरी ते पत्करतो. आतां परिस्थिती सुधारली आहे पण तरीही आपण हे लक्षांत घ्यायला हवं की अजून खूप काम करायचं आहे आणि त्याच्याकरतां आपल्याला पैशाची जरूर आहे. मला काही जरूर नाही, माझ्यासाठी मी स्वतःचे पैसे खर्च करते. पण उदारपणाची वृत्ती सगळ्यांत चांगली आणि ह्या औदार्याला सहजयोगांत फार फार महत्व आहे.

कधी कधी लोक फार चिकित्सक व हिशोबी वृत्तीचे असलेले मला दिसते. ते मला त्यांच्यासाठी साड्या आणायला सांगतात. ह्या घ्या साड्या, चांगली कल्पना आहे, ठिक आहे. वर म्हणतील आम्हाला आवडल्या नाहीत, आम्ही विकत घेणार नाही. मी काय धंदा करत नाहीये, पण तुम्हाला पाहिजे होत्या म्हणून मी निवडून आणल्या. मग नको म्हणायला इथे काही धंदा चालला नाही किंवा बाजार मांडला नाही ! असा प्रश्न आला की ते सहजयोगी आहेत कां हे मला समजत नाही ? त्यांना समजत कां नाही की माताजींनी स्वतःचे पैसे खर्च केले आहेत ? उलट असं असायला हवं की त्यांनी आपणहून म्हणावं, सहजयोगासाठी थोडे जास्त घ्या. आतां ही एवढी मोठी यंत्रणा झाली आहे, शिवाय कित्येक देशांजवळ फुटकी कवडीसुध्दा नाही, मग त्यांच्यासाठी कुणी तरी पैसे द्यायलाच हवे.

ख्रिस्तांना तीस रुपयाला विकलं गेले; कल्पना करा, फक्त तीस रुपये. याचाच अर्थ हा की तुम्ही कार्यकर्त्यांचे आर्थिक प्रश्न समजून घेत नाही, त्यांना मदत करत नाही. तुमच्यामधील ख्रिस्ताला तुम्ही विकायला निघाला आहात. तुम्ही ख्रिस्तांना विकू शकत नाही, सहजयोग विकू शकत नाही. पण त्याचा अर्थ असा नाही की तुम्ही फायद्यासाठी वापर कराल. म्हणून मला सांगायचं आहे की औदार्य असण्यांत तुमचाच फायदा आहे की त्यातूनच तुमचं लक्ष्मीतत्व जागृत होणार आहे. हा मुद्दा मला सांगावा लागत आहे कारण माझ्याकडे बऱ्याच तक्रारी आल्या आहेत की लोक पैसे द्यायला काचकूच करतात. काही लोक आपणहून पुढे येतात ही गोष्ट कौतुकास्पद आहे पण प्रत्येकाने आर्थिक भार वाटून घ्यायला हवा. हे फार महत्वाचं आहे कारण परमेश्वरी कार्य करत आहो. इतर कामं करायला पण तुम्ही कुरकुर न करता आपणहून पुढे आलं पाहिजे. त्याचाच आनंद घ्या ! सहजयोग्यांनी फलक लावलेले पाहून मला फार समाधान झालं. ह्या सर्व परिसरात चैतन्य भरून राहिल्याचं तुम्हालाच जाणवेल. हे कसं कार्यान्वित झालं आहे हे तुम्हांला समजेल. म्हणून प्रत्येकाने अगदी शर्थीने जे काही शक्य असेल ते करायला हवं. दुसऱ्या कशाची जरूर नाही, फक्त तुमचं हृदय पूर्णपणे सहजयोगाला वाहून घ्यायला हवं. मग तुमची वाढ कशी व किती होत आहे हे तुम्हाला दिसेल. तुमच्या भविष्यासाठी जरूर असलेली सर्व शक्ति तुम्हाला तुमच्याच हृदयांतून मिळेल. म्हणून हिशोब करत बसू नकां, तुमचं हृदय उघडू दे.

तुमच्याशी मला हिंदीमधे पण बोललं पाहिजे, ते फार महत्वाचं आहे. ह्या दिवशी ख्रिस्त मृत्युलोकांतून परत आले आणि त्यांचे पुनरूथ्यान झालं. तुम्ही तुमच्या देहांतूनच त्यांच्यासारखं पुनरुथ्यान मिळवलं पाहिजे, मृत्यूनंतर नव्हे तर आत्तांच म्हणजे जिवंतपणीच. जिवंत असतांनाच तुमचं पुनरुथ्यान होते पण या उत्क्रान्तीची विशेषता तुम्ही समजून घेतली पाहिजे. पुनरूथ्यानानंतर तुम्ही जास्त सूक्ष्म व्हायला हवं. आतां सहजयोगात आल्यावरही तुमच्या मनांत पैसे कमावण्याचे, धंदा करण्याचे विचार व महत्वकांक्षा जर असेल तर तुम्ही भलतीकडे आला आहांत. तुम्ही इथून दुसरीकडेच जायला हवं. सहजयोगमधे तुम्ही फक्त तुमच्या आध्यात्मिक उन्नतीचाच विचार करायचा असतो. दुसरे कसलेही विचार तुमच्या मनांत यायला नकोत.

आतां प्रत्येकजण माताजींना विचारतो आहे की बंगालमधे अजून लक्ष्मीतत्व कां नाही जागृत झालं ? याला कारण तिथे

जादूटोणा करणारे खूप लोक आहेत. जिथे जिथे ही तांत्रिक मंडळी जातात तिथून लक्ष्मी दूर निघून जाते. तीच गोष्ट दारूबद्दल. काही काळ ठिक आहे पण नंतर दारूपासून लक्ष्मी दूर जाते. बंगालमधे तांत्रिक खूप आहेत याचं कारण मला असं दिसतं की बंगालमधले लोक साधेभोळे व भावनाप्रधान आहेत व कुणीही येऊन सांगायला लागले की ते परमेश्वराचे दूत आहेत की त्यांचा लगेच विश्वास बसतो, काही विचार वगैरे न करतांच. हरे-राम म्हणणाऱ्या लोकांनी बंगालमधूनच प्रचाराला सुरुवात केली. वेड लागल्यासारखे रस्त्या-रस्त्यातून त्यांच्याबरोबर यायला लागले, हरे-राम, हरे-राम सुरु; काय फायदा मिळाला ? गरीबी आणखीनच वाढली. बंगालममधे नवीन काही म्हणायला कुणीही सुरवात केली की लोक लागले त्याच्यामागे. कुणी महिलेले मला सांगीतलं की ती कधी हिरवी पानं खात नाही, कारण विचारलं तर म्हणाली की तिची बहीण खात नाही म्हणून, ती पण खात नाही. त्यांच्याकडे तऱ्हेतऱ्हेची कर्मकांडे व व्रते असतात आणि अशा कर्मकांडामधे आपण हरवून जातो, पूर्णपणे स्वतःला विसरतो. खरं तर या कर्मकांडामागचं रहस्य, अर्थ आपण शोधून काढला पाहिजे. सहजयोगमधे कसलंही कर्मकांड नाही, कशावरही टिका नाही, कुठल्या धर्मावरही टिका नाही आणि सगळ्यांत महत्वाची गोष्ट म्हणजे विश्वबुधुत्वाची भावना प्रस्थापित होते आणि ती हृदयापासुन सुरु होते. ज्या दिवशी विश्वबुधुत्वाच्या भावनेची जाणीव होईल तत्याबेळेस आपण तांत्रिक लोकांच्या जाळ्यातून मुक्त होऊ. एकुलता एक सहजयोगी तांत्रिक लोकांना घालवून द्यायला पुरेसा असतो, एवढी त्याची शक्ति असते. मुंबईमधे गिरगांव नावाच भाग आहे, तिथे एक बाई अंगात देवी संचारली आहे असं सांगत नाच करायला लागायची. एकदा एक सहजयोगी तिथे गेला, त्याबरोबर तिने नाच थांबवला आणि ती पळून गेली. याला कारण म्हणजे भौतिक कुठल्याही शक्तीपेक्षा ही देवीची शक्ती फार प्रभावशीला आहे. तुमचं आता पुनरुथ्यान झालं आहे व तुम्ही स्वच्छ, सुंदर झाला आहांत आणि तुमच्यामधील शक्तीचा आतां आविष्कार होत आहे.

सहजयोग्यांनी स्वतःची स्वच्छता करून शुध्द झालं पाहिजे. त्याऐवजी ते भक्तीमधे आणि भावनोत्कटतेमधे दंग होतात; हे चांगलं असलं तरी 'स्व'मधे रममाणं होणं फार चांगले. तुमच्या शक्ति वृध्दिंगत करा. ज्या दिशी तुमच्यातील शक्ति प्रभावशाली होईल. त्यावेळेस हे तांत्रिक लोक बाडबिस्तरा घेऊन पसार होतील. म्हणून आजच्या या पुनरुथ्यानाच्या दिवशी तुम्ही शपथ घ्यायला हवी. तुम्ही स्वतःचं परिवर्तन घडवून उच्च स्तरावर येण्याचा आणि एक प्रगल्भ सहजयोगी बनायचा प्रयत्न कराल. आणि त्यासाठी आपण ध्यान करणं जरूरीचं आहे. तीन-तीन तास ध्यान करत बसायचं असं नव्हे तर दहा मिनिटं बसा पण हृदयापासून ध्यान करा. ध्यानामधे हृदय पूर्णपणे ओतणे फार आवश्यक आहे.

बंगालमधले लोक मोठ्या अंतःकरणाचे आहेत व प्रेमळ आहेत पण तुम्ही 'पात्रा' पाहिला आहे कां ? तुम्ही सहजयोगी असाल तर प्रथम स्वतःवर प्रेम करायला शिका मग तुम्हालाच समजेल की हेच दुसऱ्या लोकांकडेही पसरत आहे. तुम्हाला राग येईल, तुम्हाला इच्छा, वासना वाटतील, तुमच्या सवयी असतील, तरीही तुम्ही या सर्वांपासून जेव्हां स्वतःला स्वच्छ कराल तरच तुमचं पुनरुथ्यान झालं असं म्हणतां येईल. आणि तुमच्या व्यक्तिमत्वातले हे सारे दोष जाऊन तुम्ही स्वच्छ व्हाल तेव्हां इथे कोणताही तांत्रिक शिल्लक राहणार नाही. कुणीही तांत्रिक इथे राहू शकणार नाही !

दुसरं म्हणजे तुमच्यात संगीताचे चांगले कलाकार आहेत, तेव्हां अशा पुरुष व महिला कलाकारांनी एकत्रितपणे बस किंवा ट्रक भाड्याने घेऊन खेडेगावांत जावे आणि तिथे माताजींच्या भजनांचा कार्यक्रम होणार आहे असं जाहीर करावे. अशा तऱ्हेने तुम्ही तिथे एकत्र जाऊन गाणी-भजनं म्हणां, थोडं-फार बोला आणि माझ्या कॅसेटस् लावा. उत्तर प्रदेश, बिहार, हरियाना इ. उत्तर भागात पुष्कळ जण उन्नत झाले आहेत आणि त्यामुळे बऱ्याच ठिकाणी सहजयोग पसरला आहे. तुमच्याजवळ संगीताची चांगली कला आहे तर तुम्ही खेड्यापाड्यात जाऊन तिथल्या लोकांना तुमच्या कलेद्वारा आकर्षीत करा आणि त्यांच्या उध्दाराकरतां त्यांना मदत करा. असे केल्याने सगळीकडचे तांत्रिक पळून जातील. माझं नुसतं नांव ऐकलं तरी ते थरथर कापायला लागतील. तेव्हां तुम्ही जेव्हां माझी भजनं म्हणाल तेव्हां तुम्ही काय मिळवू शकणार नाही ? तुम्हाला तुमच्या आईकडून जे प्रेम मिळालं आहे ते वाटून घ्या. या प्रदेशात लोकांना प्रेमाचं किती आकर्षण आहे ते तुम्ही जाऊन पाहण्यासारखं आहे आणि तुम्ही तिथे गेलात की लक्ष्मी पण तिकडे येईल. तुमच्या जाण्याने लोकांचे शरिरीह त्रास कमी होतील, त्यांची मानसीक स्थिती सुधारेल आणि सगळ्यांत मोठी गोष्ट म्हणजे त्यांची आध्यित्मिक वाढ पण होईल. अशा तऱ्हेने आपल्याला आपल्या देशांतील लोकांमध्ये परिवर्तन घडवून आणायचं आहे आणि त्यासाठी तुम्ही सगळीकडे जाऊन कार्य करायला हवं.

आजचा दिवस फार महत्वाचा आहे आणि ते असं की ख्रिस्तांनी या दिवशी दाखवून दिलं की मानवप्राणी स्वतःच उन्नत होऊ शकतो. पण त्यांनी ज्या अटी घातल्या होत्या त्या पाळणं आपल्याला शक्य नाही. त्यांनी सांगीतलं की तुमच्या एक डोळ्याने पाप केलं तर तुम्हीच तो डोळा काढून टाका, हाताने जर गैर काम केले तर तो हात कापून टाका. मी ख्रिश्चन लोकांबरोबर खूप वावरले आहे पण ज्याने एक डोळा काढून टाकला आहे किंवा एक हात कापून टाकला आहे असा एकही माणूस ख्रिश्चन समाजात मला दिसला नाही. म्हणजे त्यावेळेस त्यांनी ही अट गुंडाळून ठेवली. आता सहजयोगांत आल्यावर तुम्ही स्वतःबद्दलच शत्रुत्व करू नका. तुम्ही आत्मपरीक्षण केलं पाहिजे आणि स्वतःचे दोष शोधून काढले पाहिजेत. तुम्हाला स्वतःबद्दल खरं प्रेम असेल तर ते दोष काढून टाका. असं केल्याने तुम्ही पूर्णपणे उन्नत होऊ

शकाल.

एकदा हे दोष काढून टाकले की तुम्हीच स्वतःला आनंदी, शांत व शक्तिशाली झाल्याचं पाहून चकित व्हाल. तुमच्या शक्तीच्या प्रभावाच्या आड येणाऱ्या साऱ्या अडथळ्यांना काहीही किंमत मोजून दूर करणं फार जरूरीचं आहे. आपण आपल्या उध्दाराकडे लक्ष देत नाही म्हणून या गोष्टी आपल्या उन्नतीच्या आड येतात; आपण इतर गोष्टींनाच महत्व देत राहतो, आपल्याला त्या जरूरीच्या वाटतात. आता पुनरुथ्यान झाल्यामुळे आपण परमेश्वराच्या साम्राज्यात आलो आहोत, पण तिथे बसण्याआधी आपण स्वच्छ झालं पाहिजे. फालतू गोष्टींच्या मागे लागून तुम्हाला काहीच मिळणार नाही, तुम्ही फक्त हे मिळालं नाही, ते मिळालं नाही अशा तक्रारी करत रहाल.

प्रथम तुम्ही स्वतःला कमी लेखणं बंद करा आणि चुकीच्या मार्गाने न जाण्याविषयी स्वतःला बजावा; नाही तर तुम्हाला शांतता कशी मिळणार ? हे फार अवघड आहे. लोक म्हणतात आम्हाला शांतता मिळत नाही म्हणून आम्ही हे नाही तर ते करत राहतो. शांती मिळवणं मुळीच अवघड नाही पण त्यासाठी ध्यान करणं आवश्यक आहे आणि सगळं काम हृदयापासून करा, मग काही अवघड नाही. सहजयोगामध्ये पुष्कळ लोक अशा स्तरावर आलेले मला दिसतात व त्यांचं प्रेम शक्तिशाली झाल्याचं दिसते.

आज मी अशाच एका माणसाचा उल्लेख करणार आहे. हा माणूस 'आई' बद्दल अगदी एकनिष्ठ आहे. आम्ही ट्रेन स्टेशनपासून विमानतळावर जात होतो. आम्ही हॉलंडला जाणार होतो आणि एका सहजयोग्याने आम्हाला सांगितलं की विमान ११ वाजता निघणार आहे. त्याप्रमाणे आम्ही तयार होतो. पण नंतर तो म्हणाला की विमान लवकर निघणार आहे आणि आम्हाला शक्यतो लवकर तिथे पोचलं पाहिजे. हे कसं जमणार ? आम्हाला पोचायला १५ मि. उशीर झाला. म्हणून तेथील ऑस्ट्रियन एअर होस्टेसला खूप राग आला. कारण ते विमान प्रथम ऑस्ट्रियाला जाणार होते. ती आमच्यावर ओरडायला लागली आणि म्हणाली "तुम्ही असेच आहांत, तुम्हाला वेळेची किंमत नाही. हे सारं ऐकून तो माणूस फार शरमिंदा झाला कारण त्यानेच आम्हाला विमानाची वेळ सांगितली होती. आम्ही सर्व जण विमानात जाऊन बसलो. हा माणूस फारच भावनाप्रधान झाला आणि त्याच्या डोळ्यांतून अश्रू यायला लागले. तो जर्मन होता आणि मागच्या सीटवर बसला होता. इतर सहजयोग्यांनी त्याला रडणं थांबवण्यास सांगितले. मी फक्त त्याच्याकडे पाहिलं आणि काही हरकत नाही, काळजी करू नकोस असं त्याला सांगितलं. त्याच वेळी आम्हाला सांगण्यात आलं की काही बिघाड झाल्यामुळे विमान निघणार नाही. पण मी त्याच्या डोळ्यातले अश्रू पाहिले आणि क्षणभरात आकाशांत सगळीकडे काळेकुट्ट ढग जमा झाले. साऱ्या सहजयोग्यांना आश्चर्य वाटलं की एकाएकी हे ढग कुठून आले ? त्याच्या प्रेमाची शक्ती पहा. आम्हाला उतरून पुन्हां विमानतळावर जायला सांगण्यात आले, कारण विमान निघणार नव्हते. आम्ही विमानतळावर पोचतांच जोराचा पाऊस पडायला लागला. दुसरं कुठलंही विमान निघणार नव्हते पण आमचं विमान पाच वाजतां निघेल असं आम्हाला सांगण्यात आले. मग तो माणूस त्या एअर होस्टेसकडे गेला आणि म्हणाला आतां तुमच्यामुळे आम्हाला उशीर होत आहे. तरी आम्ही पण तुमच्यासारखे तुमच्यावर ओरडायचे कां ? ती मॅनेजरकडे गेली आणि घडलेला सर्व प्रकार त्याला सांगितला. आतां त्या लोकांना वाटलं की आम्ही कोणी विशेष शक्तिशाली लोक आहोत. नंतर आकाशांत एकही ढग शिल्लक नव्हता. मग त्यांनी आम्हाला बाहेर जायला आणि परत आमच्या सोयीने आंत यायला परवानगी दिली; आमची सर्व काही व्यवस्था केली.

आम्ही जेव्हां दुसऱ्या विमानाकडे जायला निघालो तेव्हां एक महिला, जी आधीपासुनच हे सारं पहात होती, माझ्याजवळ आली आणि तिच्या हाताचं दुखणं बरं करायला विनंती करू लागली. मी तिला हाताने फक्त स्पर्श केला आणि तिने हात वर उचलून तो दुखायचा बंद झाला असं सांगितले. विमानतळावरचा मुख्य अधिकारी आमच्याकडे आला आणि आपल्या पाठीच्या दुखण्याबद्दल सांगू लागला. आणि ते दुखणं बरं करण्याची त्याने विनंती केली. मी त्याला उशीर होत असल्याबद्दल सांगितलं तरी तो म्हणाला की मी तुमच्यापुढे चालतो, तुम्ही पाठीमागून माझ्या पाठीवर तुमचा हातम ठेवा. अशा तऱ्हेने आम्ही विमानापर्यंत चालत गेलो. मग त्याने मागे वळून त्याचं दुखणं बरं झाल्याचं सांगितले. आमच्या जवळ ही शक्ती आहे हे या लोकांना कसं समजलं बघा. या माणसाचं प्रेम कसं आहे ते बघा आणि त्या प्रेमामधे किती शक्ती आहे हे पहा!

तुमचं तुमच्यावर प्रेम असेल तर तुम्ही स्वतःला सुधारलं पाहिजे. कधी कधी तुम्ही अधिकाराची जागा, पैसा आणखी कधी इतर गोष्टींच्या मागे लागता. तुम्ही स्वतःसाठीही थोडा वेळ काढा. बंगालमधे सहजयोगी लोक कार्य करत आहेत. पण बंगालमधील परीस्थिती तेव्हांच सुधारेल जेव्हां सहजयोगी लोक खेड्यापाड्यांत जाऊन कार्य करतील. तुम्हां सर्वांच पुनरुथ्यान झालं आहे, म्हणून आज तुम्हाला माझं सांगणं आहे की कलकत्त्यांत बसून राहू नकां तर इतर ठिकठिकाणी व खेड्यांत जा आणि काम करा. ही जी अनमोल देणगी तुम्हाला मिळाली आहे तिची वाढ इतरांबरोबर ती वाटून घेतल्यावरच होणार आहे. ज्ञान जसं इतरांशी वाटल्यानंतरच वाढतं तसं सहजयोगही तुम्ही तो इतरांना वाटल्यावरच पसरणार आहे. आणि त्याचा साऱ्या बंगालला फायदा होणार आहे.

आज पुजेला इतके सारे लोक आल्याचं पाहून फार आनंद झाला. पण मी आशा करते की मी पुढच्या वेळेस येईन तेव्हां खेड्यातली जनता पण इथे आलेली असेल. तुमची उच्च संस्कृती आणि संगीतकला यांचा उपयोग करा आणि साऱ्या बंगालमधे सहजयोगाचा प्रसार करा.

परमेश्वराचे तुम्हाला अनंत आशिर्वाद.

## ॥ श्री माताजींचा उपदेश ॥

**प. पू. माताजींनी दिनांक १८ जानेवारी १९८० रोजी राहूरी येथे सर्व सहजयोग्यांना केलेला उपदेश. हा उपदेश अत्यंत महत्वाचा आहे. कारण यामध्ये प. पू. माताजींनी आपल्या नावाचा म्हणजे "निर्मला" या शब्दाचा अर्थ विशद करून सांगीतला.**

आतां आपण इथे सगळी सहजयोगी मंडळी आहोत. एका अर्थानि हे फार बरे आहे की आपण असे भेटलो, म्हणजे आपापल्या हितगुजाच्या गोष्टी करु शकतो, आणि त्याबद्दल जे काही बारीकसारीक असेल ते सुध्दा एक दुसऱ्यांना सांगु शकतो.

परवा मी सांगीतले की आपण स्वतःला कसे स्वच्छ केले पाहिजे. कारण आपल्या आईचे नांवच मुळी निर्मला आहे. आणि या नावामध्ये पुष्कळ शकत्या आहेत.

पहिला शब्द 'निः' आहे. निः म्हणजे नाही. जे नाही पण जे आहे, असे वाटते म्हणतात महामाया. त्याचे नांव आहे महामाया. तसेच हे सर्व संसाराचे आहे. हे दिसते आहे, पण हे काही नाही आहे. ह्याला जर आपण बघितले आणि ह्याच्यात जर आपण फसलेले असलो, की असे वाटते की हे सगळे काही हेच आहे. आर्थिक परिस्थिती वाईट आहे, सामाजिक परिस्थिती वाईट आहे, संसारिक परिस्थिती वाईट आहे. सगळे वाईट दिसते. चांगले काही दिसत नाही. समुद्राच्या वरच्या थरावरचे पाणी अत्यंत गढुळ, घाणेरडे, त्याच्यामध्ये काही वस्तु तरंगत सुध्दा असतात. पण त्यांच्या खोलांत गेलं की अतके सौंदर्य, संपदा, शक्ति वगैरे सर्व काही असते, की त्यापुढे वरती काही घाण वगैरे होती हे लक्षातसुध्दा रहात नाही. पण सांगायचे म्हणजे हा सगळा भ्रम आहे. हे जे काही बाह्यातले आहे तो सगळा भ्रम आहे. "हे नाही" हे पहिल्यांदा तुम्ही लक्षांत ठेवले पाहिजे. "नि" शब्दाची जर तुम्ही स्थापना केली, की हे नाही आहे. कोणताही विचार आपल्यामधेच उठला की म्हणायचे "हे नाही". "हे ते नाही" इथून सुरवात करायची. या "नेती नेती वचने-विगमो अवोचुस" हे नाही आहे. हा विचार नाही आहे. परत हा विचार नाही आहे असे म्हणत गेले, म्हणजे "निः" शब्द जो आहे, विसर्गासहित नि आहे. त्याचा अर्थ लागतो, जो भ्रम आपल्याला दिसतो तो भ्रम नाही. तर त्याच्यापलिकडे काहीतरी आहे. ह्या भ्रमामध्ये आपण इतके भरमसाठ दिवस घालवले आहेत. आपले आयुष्य इतके व्यर्थ घालवले आहे की जे नाही ते महत्वाचं वाटते. आणि त्यामुळे आपण पुष्कळ पापांचे ढीग एकत्र केले. ह्या गोष्टीत आनंद मिळेल, त्या गोष्टीत आनंद मिळेल, त्याच्यामध्ये सुख मिळेल, ह्याच्यामध्ये सुख मिळेल, असा विचार करून आपण जे काही उपभोगण्याचा प्रयत्न केला त्याच्यामध्ये आपल्याला काही मिळाले नाही. सारे निःस्सार आहे. त्याच्यात सार नाही, निसत्व आहे.

तेव्हां अशी दृष्टी ठेवायची की "हे नाही आहे" हे सगळे साफ झूट आहे. ब्रम्ह फक्त एक सत्य आहे. बाकी सर्व झूट आहे. असा विचार करीत जायचे, मग "सहजयोगाला". अर्थ लागतो. म्हणजे होते काय की बहुतेक सहजयोगी पार झाल्यावर, त्यांना असे वाटते की आपण आतां पार झाले. तर माताजींचा आमच्यावर आशिर्वाद आहे. मग आमच्याजवळ ऐश्वर्य कां येत नाही ? म्हणजे ऐश्वर्यामध्ये परमेश्वर आहे असे त्यांना वाटते. पण पार झालो तरी आमचा स्वभाव कां बदलत नाही असा पहिल्यांदा विचार केला पाहिजे. तेव्हां मग लक्षात येईल की आपला स्वभाव बदलत नाही. 'स्वभाव' शब्द किती सुन्दर आहेत बघा. "स्व" म्हणजे आत्मा, त्याचा भाव. तो मिळवला आहे का आपण ? "स्व" चा "भाव" जर आपण मिळवला, तर बाह्यांत काहीही जर असले तरी आतले जे इतके सुन्दर आणि अनुपम आहे की ते बाह्यातले नुसते नाटकासारखे वाटले पाहिजे. हे साक्षी स्वरुपत्व जे आहे ते जोपर्यंत तुमच्यामध्ये पूर्णपणे जागृत होत नाही तो पर्यंत. 'निः' शब्दाचा अर्थ तुम्ही लावलेला नाही, आणि त्याचा उपयोगही केला नाही. असे जर मनुष्य

लक्षांत घेईल, की आपण अजूनही "निः" वर बसलेले नाही, आणि अजूनही आपण कधी तरी भावनेच्या आहारी जातो, आणि कधी तरी भावनेच्या आहारी जातो, आणि कधी कधी सत्तेच्या आहारी. दुसऱ्यावर जबरदस्ती करतो किंवा काही तरी उगीचच सहन करीत बसतो व त्याच्या बद्दल आपण रडत असतो की आपण एवढे सहन केले. त्याच्यामधोमध आपली स्थिती आहे "निः" वर. म्हणजे हेही नाही तेही नाही. ती स्थिती ध्यानामध्ये फार उत्तम होते. नुसत्या 'निः' शब्दाचा जरी तुम्ही माग केलात तरी सुध्दां होऊ शकते. निःर्विचारितां'.

पहिले निर्विचारतेत यायचे. कोणताही विचार मग कसाही असेना कां ? सुष्ट दुष्ट कसाही असेना का, त्या विचारावर जर का उड्या मारायला सुरवात झाली, एकदा जर का ते Jumping सुरु झाले, की तुम्हाला तो एक प्रकारचा "इनरशिया". किंवा म्हणायचे तर स्थिती स्थापित होते. आणि ती स्थिती झाली म्हणजे, तुम्ही प्रत्येक विचारावर उडतच असता, ह्या विचारावरून त्या विचारावर त्या विचारावरून दुसऱ्या विचारावर. म्हणून इतरेजनांनी असे सांगीतले की, एखादा वाईट विचार आला की त्याला सुष्ट विचाराचा विरोध करावयाचा. म्हणजे इकडून एखादी जर गाडी आली, तर त्याला दुसरी गाडी जर रेटली, तर दोन्ही गाड्या मग कुठेतरी मधोमध येतील. एका अर्थाने बरोबर आहे, पण कधी कधी त्याने नुकसान होऊ शकते. म्हणजे तिकडून एक विचार येतो आहे आणि आपण इकडून एक चांगला विचार काढला, की तो ह्या विचाराच्या उलटा आपण घालायचा, तर तो विचार दबुन परत चुपचाप बसेल आणि कुठेतरी एकदमच निघेल, असेही होऊ शकते. आणि असे पुष्कळांचे होते. दाबून ठेवले विचार, काही तरी चांगले केले पाहिजे, नेहमी चांगले वागले पाहिजे, दुसऱ्यांशी चांगले राहिले पाहिजे असे विचार घेऊन लोक चालले की त्रास होतो. एकदम कधीतरी तो राग निघतो. कधीतरी एकदम तो संताप होतो की लोकांना समजत नाही की हे एवढे शहाणपणाने वागणारे एवढे चिडले कसे ? आतली शांती सुध्दां सुटते आपली, आणि आतले जे काही सौंदर्य आहे ते नष्ट होऊन जाते : तेव्हां काय करायचे ? तर निर्विचारतेत राहावयाचे. विचार हाच निषिध्द ठेवला पाहिजे. अगदी निर्विचारतेत आपण राहिलो, म्हणजे मधोमध "विलंबात" - आपण आलो. विचारच सोडायचा. एकदम प्रयत्न केला पाहिजे. आता लोकांना असे वाटेल की माताजी विचाराशिवाय कसे होणार ? विचाराशिवाय कसे चालायचे ? पण हे विचार आहेत काय ? पोकळ गोष्ट आहेत. निर्विचारतेत तुम्ही आलात की तुम्ही आणि परमेश्वराची शक्ती एकाकार झालेली असते. म्हणजे तुमचा विंदु परमेश्वराच्या सागरांत आला. तेव्हां त्याची शक्ती तुमच्यात आली. आता हे बोट काय विचार करते काय ? पण फिरते नां ? विचार 'त्याला' घायचा, तु कर आमचा विचार. पण कठीण जाते. कारण आपण निर्विचारतेत असतो. पुष्कळ म्हणातात आम्ही सगळे समर्पण केले, पण तसे काही जुळत नाही, जुळत नाही बोलायच्याच गोष्टी होतात. कारण समर्पण बोलायचे नसते. निर्विचारता गाठायची म्हणजे समर्पण. म्हणजे विचारच आपण सोडला. विचार सोडल्यावरोबर मधोमध आलो. मधोमध आल्यावरोबर आपण 'निर्विचारतेत' म्हणजे परमेश्वर शक्तीशी एकाकार झालो. परमेश्वर शक्तीशी एकाकार झालो की तोच सगळे करतो. आपले, 'बारीक', 'सारिक', आपल्याला आश्चर्य वाटेल. तर हे करून बघण्यासाराखे आहे. आणि करून बघितल्यानंतर तुमच्या लक्षात येईल की तो पूर्वीचा मार्ग चुकीचा होता.

तर आपण फक्त निर्विचारतेत राहिल्याबरोबर सर्व प्रेरणा, सर्व शक्त्या, सर्व काही मिळेल. अगदी निर्विचारतेत राहिल्याबरोबर, जी कल्पना आपल्यामधे येते, ती प्रेरणात्मक असते. आणि आपल्याला आश्चर्य वाटेल की, सर्व काही समोर ताट वाढल्यासारखे वाटेल. भाषणाला उभे राहिले, निर्विचारतेत उभे राहायचे, काही विचार येऊ द्यावयाचे नाहीत, नुसते तुम्ही निर्विचारतेत उभे राहिलात, आणि बोलायला लागलात तर ज्याने कधीही भाषण दिले नव्हते, ज्याला भाषण कसे द्यायचे हे माहीत नाही, ज्याला काही विशेष ज्ञान नाही, असे असूनही तुम्ही बोलायला उभे राहिल्यावर असे बोलाल, की लोकांना आश्चर्य वाटेल की एवढे ज्ञान ह्याच्याकडे कोठून आले ? कारण निर्विचारतेत तार लागली की, हे सगळे तिथून येते, तुमच्या डोक्यातून काहीच येत नाही. आता आमचे आम्ही सांगतो आपल्याला. आता आपण प्रार्थना केली की 'आई आमचे हे कार्य करून दे'. ते आम्ही विचारात घेत नाही. आश्चर्याची गोष्ट हो. निर्विचारतेत घेतो, निर्विचारतेत घेतले की तिकडे सगळी मशिनरी तयार आहे. तिच्यात घालायचे की खट खट तयार होऊन समोर हजर त्या. मशिनरीला काम करू द्यावयाचे. Silent मशिनरी म्हटली पाहिजे. त्या शांत मशिनरी मध्ये आपले प्रश्न घातले पाहिजेत, पण ते बुध्दीजीवी लोकांना फार कठीण, कारण प्रत्येक गोष्टीत विचार करायची सवय लागली.

कोणताही विषय आकलन करताना निर्विचारिता साधता आली पाहिजे. आपोआप समोर गोष्टी येतात. आता तुम्ही

संशोधन करता. संशोधन करतानांसुध्दां ते निर्विचारतेत करा, हात चालवायचे फक्त, निर्विचारतेत. बरोबर संशोधन जमेल तुम्हाला. आता मी कितीतरी गोष्टी सांगते. मी कधी जन्मात सायन्स वाचले नाही. तसले, मला काही माहीत नाही. पण सगळे सांगते, हे सगळे ज्ञान कोठून येते ? तर त्या निर्विचारतेतून. मी नुसती बोलून राहिले आहे. नुसती बघते आहे, जाते आहे ते. ते सगळे आधी तयार केले होते, Computer मध्ये. तो बोलतो आहे आपला सटासट पण तुम्ही जर निर्विचारतेत आला नाहीत, तर तुमचा Computer तुम्ही वापरत नाहीत तुम्ही त्या Computer च्या वर आपले डोके लावले आहे. तो एवढा जुना कॉम्प्यूटर बनवलेला आहे, त्याची एवढी मेहनत केली आहे. त्याचे एवढे अचूक सगळे काम करून ठेवलेले आहे. आणि तुम्ही त्या कॉम्प्यूटरचे न ऐकताच आपलेच चऱ्हाट लावलेले आहे, तर तुमच्या हातून चूका होणारच. त्याला काही अर्थ आहे ?

तर याला शब्द 'प्र' आहे. आणि प्रशिक्षण वगैरेला आपण 'प्र' शब्द वापरतो. 'प्र' म्हणजे निर्विचारतेत जे काही घडते ते सगळे 'प्र' आहे. ते इतके 'प्रचंड' आहे, पहा 'प्र-चंड' आहेत पण चंडावरती 'प्र' आहे. 'प्रकाशित' 'प्रज्ञ' असे 'प्र'. ह्या शब्दाचा अर्थ असा आहे की Enlightened प्रकाशित आहे. प्रकाश बोलतो का काही ? आता समजा ह्या खोलीत आपण प्रकाश केला, तर तो काही बोलत नाही, की विचार देत नाही, तर दाखवतो स्पष्ट की हे आहे ते आहे. तसाच निर्विचारीतेचा प्रकाश आहे. तो नि आणि हा निः ह्यालाच निर्विचार, निर्वाज्य, निरंकारी, निराकार, असे अनेक शब्द 'नि' पासून येतात. पण निर्विकल्पांत येतां येतं. आधी निर्विचार व्हायचे, मग निर्विकल्प, मग विकल्प सुटतात म्हणजे कळते की काही तरी शक्ती आहे. आणि ती सगळे कार्य करते, पटापट. आणि ती कशी कार्य करते, अगदी बारीक असते तिचे काम. तुम्हाला अगदी आश्चर्य वाटेल की असे कसे घडते. आतां वेळेचे पण तसेच आहे. म्हणून आम्ही घड्याळ्यात कधी बघत नाही. कधी कधी घड्याळ बंद पडले म्हणजे १ च्या वेळेला ३/४ वाजलेले असतात. पण आमचे खरे घड्याळ निर्विचारतेत असते. ते थांबलेले घड्याळ आहे. Permanent. ज्या वेळेला जे करायचे ते घडून येते, घडवून येते. मग काही वाईट वाटत नाही, उशीर झाला तरी, नाही झाला तरी, काही झाले तरी आपण आहोत ना जिथे आहोत तिथे ? आता काल गाडी फेल झाली, पण आम्ही बसलो आरामात, आम्हाला बघायचे तारे, चांदण्या वगैरे, कारण आम्हांला लंडनला तारे कधी बघायला मिळत नाहीत. ते एक सौंदर्य पाहायचे होते. त्यावेळेला आकाशामध्ये त्याचे प्रचंड वैभव पसरलेले होते. तर आकाशाला वाटले माताजींनी आपले हे सौंदर्य पहावे. कधी कधी त्याच्याकडेही बघितले पाहिजे नां ? मजा वाटत होती. म्हणजे काय आहे की आपण कोणाची बंदीश करायची नाही. फक्तक्त निर्विचारीतेत राहिले की परमेश्वर आपल्याला अगदी हातावर संभाळून सगळी कडे नेतो. सगळी व्यवस्था करतो. त्याला काही सांगावे लागत नाही, त्याला सगळे माहीत आहे. पण तुम्ही त्या प्रवाहात आहांत कां नाहीत हे पाहिले पाहिजे, आणि जर तुम्ही त्या प्रवाहात नाहीत तर तुम्ही अजून काठावरच अडकलेत. मग तो प्रवाह येतो, ढकलतो, दोन तिनदा काढतो, पण परत चालतो त्या काठावर. मग म्हणायचे माताजी आमचे काही जुळतच नाही, होतच नाही, पण तुम्ही अडकलेत नां. आपली गणेशस्तुती फार सुंदर आहे. त्यांत म्हटले आहे 'पडतां प्रवाही', प्रवाही शब्द वापरलेला आहे. प्रवाहांत जेव्हां आम्ही पडतो, प्रवाह, प्रवाहात वाहायचे म्हणजे त्याच्यामध्ये आपला प्रवाह नको 'प्र-वाह' परत 'प्र' आला. जे वाहन करतो परंतु 'प्र' 'एन्लाईटन्ड' जो आहे, त्या प्रवाहात पडा. 'पडतां प्रवाही', आपले जे आहे नां ? तसेच 'निर्वाणि रक्षावे' आमचे जेव्हा निर्वाण होईल तेव्हां तुम्ही आमचे रक्षण करा. 'रक्ष रक्ष परमेश्वर' असे आपण परमेश्वराला म्हणतो. पण आम्हीच आमचे रक्षण करत बसलो आहोत. मग परमेश्वर कशाला तुमचे रक्षण करणार ? तो म्हणतो, चला ! चला ! चालू दे थोडेसे. होउ दे त्यांचे रक्षण. तर मुद्दा असा की आपण आपल्या गांभीर्यात उतरायला शिकले पाहिजे. हे निर्विचारीतेतले समजले पाहिजे म्हणजे 'निर्विकल्प' होणार. 'निरासक्तक्त' आसक्तता नसली पाहीजे. माझा मुलगा, माझी मुलगी, हे आपल्याकडे विशेष आहे. इंग्लंडला उलटे आहे, तिकडे माझा मुलगा, माझी मुलगी नसते, मी फक्त माझ्यापुरते. इकडे माझा मुलगा, माझे घर, असे माझे माझे चालले की शेवटी तसेच होते. शेवटी मग मीच राहून जाते. माझे काही नाही, तुझेच सगळे आहे. कबीराने फार सुंदर लिहिलेले आहे की बकरी जेव्हां जिवंत असते तेव्हां बे बे करीत असते, परंतु तिला मारल्यानंतर तिच्या आतड्याच्या तारा करून त्या जेव्हां धुमकीला लावतात तेव्हां त्याच्यातून 'तूही' तूंही, तूंच एक आहेस, तूच एक आहेस असा ध्वनी निघतो. तसे आपले झाले पाहिजे. मी नाही माझे अस्तित्वच नाही. असे एकदा ठरवले म्हणजे निः शब्दाचा अर्थ लागतो.

नंतर आपण 'ल' शब्द घेऊ या. ल शब्द हा ललितेचा शब्द आहे. माझे दुसरे नांव 'ललिता' आहे. हे देवीचे वरदान

आहे. हे देवीचे अस्त्र आहे. 'ला' म्हणजे देवी जेव्हां 'ललित' होते; किंवा शक्ती जेव्हां ललित होते - ललित म्हणजे कार्यशिल - तिच्यामध्ये जेव्हां लहरी येतात, तुमच्या हातात लहरी आहेत, ह्या लाटा, हातांमध्ये ह्या लाटा येऊन राहिल्या आहेत, ही शक्ती जेव्हां कार्यान्वित होते; त्या शक्तीला 'ललिता' शक्ती म्हणतात. ती अत्यंत सौंदर्यशाली आहे, प्रेममय. प्रेमाची शक्ती जेव्हां कार्यान्वित होते ती ही 'ला' शक्ति. आणि सगळीकडे तुमच्यावर आवरण आहे. ती कार्यान्वित आहे, ती कार्यान्वित असल्यावर, मग कशाला काळजी करायची ? तुमची काय हो शक्ति आहे ? अहो एकाही झाडातून तुम्ही फळ काढू शकत नाही, एकाही ! काढून दाखवा पाहू, फळाचे सोडा, तुम्ही एक पान सुध्दा काढू शकत नाही. एक मूळ काढू शकत नाही. मग हे जे सर्व कार्य जी शक्ति करते ती 'ला' शक्ति आहे. इतकेच नाही, जर तुम्हाला पार केले, ती सुध्दां 'ला' शक्ति आहे. त्या शक्तितूनच 'म' शक्ति आणि 'नि' शक्ति अशा दोन्ही शक्त्या निघालेल्या आहेत. म्हणजे 'निः' शक्ति ही ब्रम्हदेवाची शक्ति सरस्वती ही आहे. आणि 'सरस्वती' शक्तिमध्ये मनुष्याला 'निः' पणा आला पाहिजे. निः पणा म्हणजे पूर्णपणे अनासक्तता. अनासक्तता यायला पाहिजे. 'ला' शक्तिमध्ये प्रेम आहे. आणि तीच शक्ति इतरांशी आपला संबंध जोडते. 'ललाम', 'लावण्य' ह्या सर्व शब्दामध्ये 'ला' शब्द येतो. 'ल' ह्या शब्दाला एक गोडवा आहे. आणि त्या गोडव्याने आपण सर्वांना भाराऊन टाकले पाहिजे. सगळ्यांशी बोलताना आपण ती शक्ति वापरली पाहिजे. म्हणजे सगळीकडे चराचरामध्ये ती शक्ति, ती प्रेमशक्ति पसरली आतांना आपण काय केले पाहिजे ? एक तर विचार सोडला पाहिजे पहिल्या शक्तिचा. कारण पहिल्या शक्तिमुळे विचार उत्पन्न होतात. आणि शेवटच्या शक्तिमध्ये काय केले पाहिजे ? जी 'ला' शक्ति आहे, त्या शक्तिमध्ये आपण, त्या प्रेमाचा आनंद घतला पाहिजे. तो कसा घेणार ? एकाकार, तन्मय होऊन. आपले प्रेम दुसऱ्यावर किती आहे हे कोणी कधी मोजते कां ? ते मोजले पाहिजे. काय मजा येते अगदी, वाः किती आपले प्रेम आहे हो ऽ सगळ्यांवर ? असे कधी येते की नाही तुमच्या डोक्यात ? माझे तसेच असते, नेहमीच. की मला हे वाटते की काय हो हे प्रेम वाहून राहिले आहे बरे? किती छान वाटते बरे ? पण तसे तुम्हाला वाटते की नाही मला माहीत नाही. माणसांचे मला समजत नाही एवढे, पण मला असे वाटते, वा वाह, काय प्रेम वाहते आहे ? जसा एखादा स्वरकार किंवा एखादा कलाकार जेव्हां आपले संगीतात मग्न होतो, तेव्हां जसे त्याला वाटते की काय आपले संगीत वाहून राहिले आहे ? तसे हे प्रेम नुसते अवाधित वाहिले म्हणजे ती 'ललाम' शक्ति तीच ह्या लाटांची शक्ति आणि तीच ही ललित शक्ति आहे. तर त्या 'ललिता' शक्तिला प्राप्त झाले पाहिजे.

त्याच्यामध्ये पहिले असे की दुसऱ्याकडे आपली जी दृष्टि असते ती कशी आहे त्याच्याकडे आपण लक्ष दिले पाहिजे. म्हणजे खालच्या प्रतीच्या, म्हणजे निम्नस्तरावरच्या लोकांची दृष्टी दुसऱ्याच्याकडे नेहमी अशी असते की ह्याचे काय मारायचे, ह्यांच्याकडून आपले काम कशाप्रकारे करून घ्यावयाचे. अशी ही निम्नस्तरातील लोकांची दृष्टी असते. त्याच्यावर दुसरे काही लोक असे असतात की दुसऱ्याचे काय वैगुण्य असेल ते बघत असायचे. त्यांच्यात त्यांना काय आनंद मिळतो मला माहीत नाही. ह्या माणसाला हेच नाही आहे. त्याचे तोंडच वाकडे आहे, त्याचे घरात पटतच नाही वगैरे पण त्यांनी काय मिळणार आहे आपल्याला ? मनुष्य अशाने माणूसघाणा होतो, आणि त्यांनी माणसाला स्वतःला त्रास होतो तेव्हां स्वतःला कसा त्रास करून घ्यायचा ते माणसाकडून शिकले पाहिजे. मला काही ते जमत नाही. अहो मला तर सगळ्यांना भेटले की केवढा आनंद होतो.

तर ही ललाम शक्ति जी आहे, जी वापरायची, त्या शक्तिला आपण असे वापरले पाहिजे की दुसऱ्यांच्याकडे पाहतांना आपण निर्विचारीतेत जावे. निर्विचारीतेत गेल्याबरोबर, त्या माणसांतही निर्विचारता येईल. म्हणून मी म्हणेन बंधन ह्या 'नि' शक्ति आणि 'ला' शक्तिला जर बंधने दिली, म्हणजे ला शक्तिला जर 'नि' मध्ये आणले तर फार फायदा होतो. आतां पुष्कळांना सांगावे लागते की डावी बाजू उचला व उजवीकडे घाला. अती गर्वी लोकांना म्हणजे, मी फार कार्य करीत आहे असे ज्या लोकांना वाटते किंवा जे फार कार्यरत असतात त्यांना सांगते की डावी उजवीकडे घाला. म्हणजे स्वतःचे जे प्रेम आहे ते आपल्या पाचही तत्वात भरायचे. जसे कॅनव्हॉसवर आपण रंगभरतो, तसे आपल्या हृदयांतले जे प्रेम आहे, ती प्रिती जी आहे, ती आणून आपल्या कार्याची जी शक्ति आहे त्याच्यामध्ये ही शक्ति भरायची. ती शक्ति एकदा भरली की त्या अशा माणसाला रंग चढतो. आणि तो हळू हळू असा पसरतो, त्याची प्रिती अशी वाहते, मराठीत एक शब्द आहे 'स्नेहाळते', त्याची कृती जी आहे ती स्नेहाळते. आणि अशा माणसाला असा काही रंग चढतो व असा काही आकर्षक बनतो असा माणूस. अशा माणसाजवळ तासन्तास बसले तरी असे वाटते की आपण बसलो आहोत कुठे तरी. छान निवांत असे, तर ती प्रिती स्नेहाळली पाहिजे, व त्याचा उपयोग असा होतो की माणसे जोडली जातात, आपलेपणा वाढतो. सगळ्यांना

वाटते की कुठे तरी असे स्थान आहे, जिथे आपल्याला प्रेम, स्नेह सगळे मिळणार आहे. तर ही प्रभूची जी प्रेमाची शक्ति आहे, तिला जोपासली पाहिजे. आपल्यामध्ये जर असे विचार आले. कोणतेही, तर आपण समजले पाहिजे की आपण त्या गंगेमध्ये घाण टाकतो आहे. असा जर आपण विचार ठेवला तर आपली जी 'ला' शक्ति आहे, प्रेमळ शक्ति आहे ती पूर्णपणे स्वच्छ राहील. अगदी स्वच्छ राहील आणि त्याच्या स्वच्छतेत आपल्याला खूप आनंद वाटेल. दुसऱ्यांच्याकडे पहाण्याच्या दृष्टीमध्ये कोणतीही चिकित्सकता असतां कामा नये. मला जर तुम्ही कोणाविषयी विचारलेत की हे गृहस्थ कसे आहेत, तर मी फार तर कुंडलिनीवर सांगू शकेन की ह्यांचे कोठले चक्र पकडले आहे, किंवा त्याचे हे धरते कधी कधी. पण त्याच्यापलीकडे, हे गृहस्थ कसे आहेत, त्यांचा स्वभाव कसा आहे असे जर कोणी विचारले, तर माझ्या लक्षातच येत नाही ती गोष्ट. मी म्हणते, अहो स्वभाव म्हणजे काय ? दोन मिनीटाची गोष्ट, आज नदी इथे वाहत आहे, तर उद्या कोठे वहाणार आहे ? काही सांगता येणार नाही. आता तुम्ही कोणत्या मुक्कामावर बसला आहात ते पहायचे आहे. तुम्ही जर इकडेच बसलात घाणीत तर इथे वाहाते आहे ते विक्षिप्त वाटणारच तुम्हाला. आम्ही सागराकडने पाहात आहोत तर ही नदी कुठे येणार आहे हे आम्हांला माहीत आहे आणि परिवर्तन हे सहजयोगांत नेहमी होत असते. तेव्हां कोणत्याही माणसाला असा ठपका देऊ नये, की हा मनुष्य अगदी कामातून गेलेला आहे, आता हा काही कामाचा नाही. तर असं नाही म्हणायचे. प्रत्येक माणसामध्ये परिवर्तन होणार, आणि झालेच पाहिजे. नाहीतरी आपल्या सहजयोगाचे कार्य म्हणजे पविर्तनच आहे. तेव्हां ज्यांचा सहजयोगावर विश्वास आहे, त्यांनी कोणत्याही माणसाला असे म्हणता कामा नये की 'हा कामातून गेला'. प्रत्येक माणसाला ह्याची पूर्णपणे सवलत दिली पाहिजे. आता आपणच बघतां की आम्ही कोठे होतो व कोठे आले, आणि आता नदी कुठे चालली पुढे. असा जर विचार केला तर, तुम्ही स्वतःची तर इज्जत करालच पण दुसऱ्याची पण कराल, स्वतःची ज्या माणसाला इज्जत नसते तो दुसऱ्याची करत नसतो. तेव्हां 'ललाम' शक्तिला खूप वाढवले पाहिजे. ह्याच्यावर बोलायला लागले तर एक पुस्तकच लिहावे लागेल, पण त्याची मजा काय आहे ते मी तुम्हाला सांगु शकणार नाही. कारण ते शब्दांत घालता येत नाही. शब्द फारच अपुरे पडतात. ह्या गोष्टीला शब्दांत घालायचे म्हटले तर जसे स्मित जर तुम्ही अंकीत करायचे म्हटले, तर त्याचे स्नायु तुम्ही अंकीत कराल. पण त्याचे इफेक्टस् तुम्ही सांगु शकणार नाहीत त्यातलेच आहे ते. ह्या शक्तिला खूप वाव दिला पाहिजे, वाढवली पाहिजे.

'ललाम' शक्ति, त्यांनी माणसाला एक सौंदर्य, एक आकर्षकता, एक फार चांगला स्वभाव मिळतो. बोलताना, वागण्यांत, सर्व गोष्टींमध्ये आपण हे बघितले पाहिजे की ललाम शक्ति वाढले का ? म्हणजे एखाद्या माणसाच्या रागावण्यात सुध्दा इतका गोडवा असतो, की ते रागावणे सुध्दा गोड असते. अशा फारच गोड आणि मधुमय शक्तिला 'ललिता' शक्ति असे म्हणतात. त्याचा अगदी विपर्यास लोकांनी करून ठेवलेला आहे. की लोकांचे असे म्हणणे आहे की 'ललिता' शक्ति संहारक वगैरे असते, पण तसे मुळीच नाही. ही अत्यंत सुंदर आणि फारच कारीगरीवाली असते. ही एवढी कलात्मक असते की समजा तुम्ही एक बी पेरली तर त्या बी मधले काही अवयव नष्ट होतात. ती ललिता शक्ति. पण ते अगदी हळूच, सहज त्याच्यावर मग झाड येणार, त्याला मग पाने येणार, पाने गळतात सुध्दा तेही अगदी सहज, त्याच्यानंतर मग फुले आली आणि त्या फुलांना जेव्हां फळे येतात तेव्हां फुलातलेही काही प्रकार गळतात, आणि फळे येतात. पुढे फळेही कापावी लागतात, आणि खावी लागतात. आणि खाल्यावर जो आस्वाद येतो तोही ती शक्ति. त्याप्रमाणे या दोन्हीही शक्त्या, म्हणजे काहीतरी काटछाट केल्याशिवाय जशा मूर्त्या बनत नाहीत, तसेच ही काटछाट सुध्दा, त्यांच्यातलाच एक भाग आहे, असे जेव्हां आपल्या लक्षात येईल, तेव्हां आपल्या हातून जर काही काटछाट होत असली तर ती वाईट आहे असे समजले नाही पाहिजे, त्याचीही गरज आहे, पण ती काटछाट एखादा कलाकार कलात्मक रितीने करतो व एखादा बोथट माणूस ती बोथटपणाने करतो. तुमच्यामध्ये किती कलात्मकता आहे त्याच्यावर ही शक्ति अवलंबून असते. आता एखादे चित्र आपण बघावे, आणि ते बघतच राहावे असे वाटते. कोणी विचारले की ह्या चित्रात एवढे काय आहे, तर ते शब्दांत सांगता येत नाही बुवा. ते नुसते बघतो आम्ही. तेव्हां काही काही अशी चित्रे असतात की ती बघितली की निर्विचारीता स्थापित होते. निर्विचारीता स्थापित होऊन मनुष्य नुसता संबंधच्या संबंध आनंद लुटीत असतो. आणि ही स्थिती सगळ्यांत अत्युत्तम आहे. त्याला असे आहे तसं आहे किंवा त्याची कशाशी तुलना करायची, किंवा अलंकारीक भाषेत ते वर्णन करण्यापेक्षा, नुसता त्याचा मनसोक्त आनंद घ्यायचा. 'रसस्वाद' म्हणतात त्याला. तसा रसस्वाद घेत राहायचे. त्याला शब्द नाहीत त्याला वर्णन नाही आहे. त्याला फक्त आतून अनुभवयाचे आहे. तो अनुभव सगळ्यांना घडला पाहिजे.

आता 'म' मधला शब्द फार मजेदार आहे. 'म' हा महालक्ष्मीचा शब्द आहे. 'म' म्हणजे आपली धर्म शक्ति, तशीच आपली उत्क्रांतीची ही शक्ति आहे. 'म' शब्दामध्ये माणसाला धडपड करावी लागते. गोष्ट आत्मसात करावी लागते. आतमध्ये घ्यावे लागते, आकलन करावे लागते. दोन्ही करणे जसा एखादा कलाकार आपल्या 'ला' शक्तिने आपल्या कृतीची कल्पना करतो, नंतर 'नी' शक्तिनी त्याची रचना करतो, आणि त्याला ठीक करायचृच्या वेळेला तो 'म' शक्ति वापरतो. प्रत्येक वेळेला बघतो टीक आहे कां ? नाही. मग परत करायचे, परत बघायचे, असे करीत रहातो. ती 'म' शक्ति झाली. म्हणजे हे टीक नाही ना ? मग दुसरे करायचे तिसरे करायचे. हे जे 'ठीक' करायचे काम आहे त्याला थोडी धडपड पाहिजे. स्वतःलाही ठीक करीत राहावे लागते. ते जर आपल्यामध्ये नसते तर उत्क्रांती झाली नसती. परमेश्वराला फार धडपड करावी लागते. म्हणजे ही 'म' शक्ति आपल्याला हस्तगत करावी लागते. आणि त्या शक्तिला प्राप्त होण्यासाठी टिकवावे लागते. ते टिकवणे जर आले नाही तर दोन्हीही शक्त्या झडून पडतात. कारण ही शक्ति मध्यबिंदु आहे. ॐठत्दज्ञठ तङ्ग उज्ञञड्डिदी आहे. तेव्हां मध्यबिंदुमध्ये असायलाच पाहिजे, आणि 'मध्यबिंदु' ही 'म' शक्ति आहे, आपल्या उत्क्रांतीची. आणि त्या उत्क्रांतीच्या शक्तिवर जेव्हां तुम्ही वाढत जाल, तेव्हांच या दोन्ही शक्त्या तुमच्या मधून कार्यान्वित होतील. पण 'म' शक्तिची मात्र पूर्णपणे समज यावयास पाहिजे, आणि त्याची जोपासना केली पाहिजे. म्हणजे असे की "असेल माझा हरी तर देईल खाटल्यावरी" जागृती होईपर्यंत ठीक आहे, तो देईल खाटल्यावरी. कबूल, त्याच्यापुढे ? त्याच्यामध्ये ही 'म' शक्ति जी आहे, ती आपल्यामध्ये दोन्हींचे संतुलन घेऊन करावी लागते. रंगांचे जसे आपण संतुलन करतो, रागादारीत जसे आपण स्वरांचे संतुलन करतो, तसेच आपल्याला ह्या दोन्ही शक्तिचे 'नि' आणि 'ला' यांचे संतुलन साधावे लागते. ते संतुलन साधण्यासाठी, आपल्याला धडपड करावी लागते. ते आपल्यातून पुष्कळदा निघून जाते, ज्यांनी हे साधले, तो सहजयोगी उच्चस्थितीला गेला, फार जास्त 'इमोशनल' सहजयोगी काही कामाचा नाही. तसेच फार जास्त कार्यरत सहजयोगी सुध्दा कामाचा नाही. पण जो आपल्या प्रेमशक्तिला कार्यरत करतो, आणि वारंवार त्याचे सिंहावलोकन करतो, म्हणजे समजा आमची काही कार्यपध्दती आहे, त्यांत प्रत्येक वेळेला माताजी आपले काही तरी निराळे काढतात. हे तुम्ही पाहिले असेल की प्रत्येक वेळेला माझे काहीतरी नवीन असते. नवीन पध्दत असते. त्यांत हे नाही जमले तर दूसरे काहीतरी करून बघायचे, ते नाही जमले तर तिसरे. जर डोक्याकडून नाही जमले तर शेपटाकडून, कधी हसवून करते, कधी रडवून करते, कधी समजावून करते, कधी प्रेममाने सांगते. तसेच प्रत्येकाने आपली पध्दती फिक्स नाही करायची. सकाळी उठले, कुंकू लावले, माताजींना नमस्कार केला, की मेकॅनिकल झाले. तुमची ही जीवंत पध्दती नाही. जिवंत पध्दतीमध्ये नविन नविन पध्दती शोधून काढायच्या. जसे मी नेहमी मुळाचे उदाहरण देते, की एक मुळ निघाले, ते हळू हळू खाली जमीनीत रुजत जाते. आता जिथे जिथे त्याला अडचणी येतात तिथे तिथे ते बरोबर वळसा घालून ते निघते. ते काही भांडत नाही आणि जर ह्या अडचणी नसत्या तर ते झाडाला मुळी धरुच शकणार नाही. म्हणून त्या अडचणी पाहिजेत. अडचणी असल्याशिवाय तुमची प्रगतीच होणार नाही. पण त्या अडचणींवर कशी मात करावयाची ते जी शिकवते ती ही 'म' शक्ति आहे. आणि म्हणून ती 'मा' शक्ति आहे. ती आईची शक्ति आहे. म्हणजे त्याला सगळ्यांत प्रथम मनुष्यामध्ये सुज्ञता म्हणजे ज्याला ङ्ड्डयड्डतण म्हणतात, ते पाहिजे. समजा एखादा माणसाचा स्वभाव गरीब आहे, तर तो म्हणतो माताजी आम्ही आपले गरीब आहोत काय करणार. अहो बदला तुम्ही ! सिंह व्हा, बरे एखादा सिंह आहे ! तर आता तुम्ही शेळी व्हा. असे केल्याशिवाय होणार नाही. आपल्या पध्दती बदलायला पाहिजेत. ज्या माणसाला आपल्या पध्दती बदलता येणार नाहीत तो मनुष्य कधीही सहजयोग वाढवू शकणार नाही. कारण तो एका पध्दतीला चिकटला. लोक कंटाळले त्या पध्दतीला. आता काही तरी नवीन पध्दत पाहिजे. बोअर होता कामा नये, मनुष्य ही 'म' पध्दती. ही बायकांना चांगली साधते. म्हणजे आज पोहे केले, मग उद्या करंजा, परवां असेच काहीतरी म्हणजे नेहमी बदलत जायचे. पुरुषालाही नेहमी उत्सुकता असते की आज घरी काय 'बेत' असणार ?

तर ही जी स्थिती आहे, ज्यांनी मनुष्य संतुलन साधतो. ज्यांनी मनुष्य 'एकरसता' प्राप्त करतो. ह्या शक्तिला जेव्हां तुम्ही उच्च स्थितीला नेता, तेव्हां हे जे व्हायब्रेशन्स आहेत ते फुटतात. हे जे व्हायब्रेशन्स आहेत ते संबंध संतुलनांत, संबंध सुज्ञतेतच वाहातात. जर तुमच्यात सुज्ञता नसली, तर हे व्हायब्रेशन्स वाहणार नाहीत. ज्या माणसामधून व्हायब्रेशन्स अत्यंत येतात तो सुज्ञ आहे. त्याची सुज्ञताच वाहाते आहे, हे लक्षात ठेवले पाहिजे. तुम्ही जरी कितीही मोठे सहजयोगी आहांत असे दिसते तरी ते पायावर दिसते. पकड येणार, त्या पकडी आल्या म्हणजे समजायचे की आपले संतुलन सुटलेले आहे. आणि संतुलन सुटले आहे म्हणजे काय तर आपल्यामध्ये 'म' शक्ति कमी आहे. म्हणून आमचे नांव

खरोखर 'माताजी' जे काढलेले आहे, त्यांतले हे पहिले अक्षर 'मा' च आहे, आई आहे. आणि आमच्या या 'मा' शक्तिमुळे हे कार्य घडून आले आहे. आता जर 'ल' शक्ति असती तर काही जमले नसते. 'निः' शक्ति असती तरीही काही जमले नसते. आम्ही या तिन्ही शक्त्या घेऊन आलो. पण खरेच यांच्यावरा मात आहे ती 'मा' शक्तिची. आणि 'मा' शक्तिचे तुम्ही पाहिले आहे की आईचे पहिल्यांदा हे सिध्द झाले पाहिजे की ही आमची आई आहे. अहो आता कोणीही आले आणि म्हणाले की मी तुमची 'मा' आहे, तर तुम्ही मानाल का ? नाही मानणार. आईची सिध्दता व्हायला पाहिजे, की ही आमची आई आहे. आई म्हणजे काय ? आमचे स्थान आहे ती. आमचा तिच्यावर पूर्ण अधिकार आहे आणि तिचा आमच्यावर. कारण ती आमच्यावर एवढे प्रेम करते, अगदी निर्व्याज तिचे प्रेम आहे. ती आमची हितचिंतक आहे, ती आमचे नेहमी मंगल चिंतीत असते, आणि तिच्या हृदयांत आमच्या विषयीच्या प्रेमाशिवाय दुसरे काहीही नाही. जे आम्हांला म्हणजे 'स्व' ला सुशोभित आहे तेच तिच्यामध्ये आहे, असे जर लक्षात आले तरच आईवर विश्वास बसणार आहे. तर ती सिध्दता दुसऱ्यांना पटवून दिली पाहिजे आणि तेच सहजयोग्यांना साधले पाहिजे, आणि इतरांना वाटले पाहिजे की हा एक सुज्ञ आहे. आणि त्याच्या करीतां संतुलन यायला पाहिजे. ते संतुलन प्रेमाचे आणि कार्यशक्तिचे असे सुंदर साधले पाहिजे की लोकांना नकळतच, त्या माणसाचा प्रभाव किंवा परिणाम सर्वांवर पडला पाहिजे. हे सहजयोग्यांनी साधायला पाहिजे.

आता या तिन्ही शक्त्या कशा वापरायच्या त्या कार्यान्वित कशा करायच्या वगैरे तुम्ही घरी विचार करा. म्हणजे 'निः' शक्तिने घरामध्ये सगळे सौंदर्य असले पाहिजे. ग्रॅव्हीटी असली पाहिजे, नवीन नवीन तऱ्हेने विचार केला पाहिजे, लोकांशी बोलण्याच्या पध्दती सुध्दा नवीन काढल्या पाहिजेत, सहजयोग पसरवण्याच्या शक्त्या वापरल्या पाहिजेत. आणि या शक्त्या जर तुम्ही नाट वापरायच्या तर त्याला 'निः' शक्ति म्हणजे कार्यशक्ति, फार जबरदस्त असायला पाहिजे. आणि मग ती जर शक्ति जमली नाही, म्हणजे अर्थात 'ला' शक्ति मुल्य प्रेम शक्ति ती पाहिजे. पण प्रेमशक्ति कार्यान्वित आणावयाची ती 'निः' शक्तिने, पण तेही जमले नाही तर दुसरे. पहिल्यांदा लाल आणि पिवळा रंग वापरु, हे जर योग्य नाही झाले तर हिरवा लाल वापरु, तेही नाहीच जमले तर तिसरे. हे जे सुज्ञपणाचे आहे की हट्ट ठेवतां कामा नये. हट्टी स्वभाव असला की सहजयोगात जमणार नाही. आपल्याला काय सहजयोगच पसरवयाचा आहे ना ? मग हे नाही जमले तर ते केले, तेही नाही जमले तर आणखी काही केले. आता मी तुमच्या हट्टाला फार बळी पडते. कारण मला हे माहीत आहे की माणसाचे आमच्यासारखे नाही आहे, त्यांचा हट्ट काय करून टाकेल सांगता येत नाही. तेव्हां माणसाच्या हट्टाला केव्हाही पेटवता कामा नये. हे आम्हांला समजते तेही 'म' शक्तिने पण आपला हट्ट सोडला पाहिजे. माताजींना हट्ट नसतो. जे आहे ते खरे आहे, जे काही करायचे ते विशेष आहे म्हणून करायचे आता आम्हाला काही इच्छा नाही आहे. आमच्यामध्ये काही 'ला' शक्ति नाही की 'निः' शक्ति नाही की 'म' शक्ति नाही, काहीही नाही. त्या शक्त्या आम्ही आहोत हेही आम्हाला माहीत नाही. आम्ही काही नाही नुसते बघत असतो सगळा खेळ.

असले जीवन जेव्हां होऊन जाते तेव्हांच, मानवामध्ये सिध्द सहजयोगी तयार होतील. अजून सिध्द झालेले नाहीत. सिध्दता साधली पाहिजे. सिध्द सहजयोगी जो असतो, तो अगदी एकतान होऊन परमेश्वराला आपल्या कावूत करून घेतो. सगळे काही त्याच्या हातून व्हावे लागते. आता मी जाते आहे. माझ्या मागे तुमची सिध्दता कशी कशी व कुठे वापरता ते बघायचे आहे. आणि मी मधून मधून प्रत्येकाला सांगत असते की असे करु नका, तर त्याचे वाईट नाही वाटून घ्यायचे म्हणजे 'म' शक्तिमध्ये वाईट वाटून घ्यायचे नाही. म्हणजे मला सांगायलाच पाहिजे. पण पुष्कळांना वाईट वाटते. आम्ही सिध्द झाले पाहिजे, ही गोष्ट जर लक्षात धरली आम्ही सिध्द आहोत हे सगळ्यांनी मानले पाहिजे, बघितल्याबरोबर पटले पाहिजे की हे सिध्द आहेत, इकडे काळजी घेतली पाहिजे. असे जर झाले तर सगळे उत्तम होईल.

मी एकदां सांगीतलेआहे की एकदां आपल्या नातलगांना आपल्याकडे जेवायला किंवा हळदी कुंवाला बोलवा. आमच्याकडे फार मोठी पुजा आहे. असे सगळ्यांना सांगायचे. बरोबर काही सहजयोगी बोलवायचे व आलेल्यांना जागृती द्यायची असे जर आपण वर्षभर केलेत तर पुष्कळ फायदा होईल. सर्वांना अनेकोत्तम आशिर्वाद.



# सहजयोग आणि श्री कलकीचे अवतरण

श्री कलकी बद्दल पौराणिक वाङ्मयातून जे काही घोषत केले गेले, ते अगदी अटल सत्य आहे. असे सांगीतले गेले की कलीयुगाच्या शेवटी ते (श्री कल्की) येतील, त्यावेळेस सद्गुणांचा ऱ्हास झालेला असेल, दुष्काळ असेल, युध्द व गुन्हेगाराचे राज्य असेल, स्त्रियांना उदंड संतती झालेली असेल. ब्राम्हण आपले ज्ञान हरवून बसलेले असतील. त्यांना ओळखण्यासाठी त्यांचे जवळ फक्त जानवे असेल, सत्य आणि मोलाचे उच्चाटन झालेले असेल. पवित्र संस्कार संपलेले असतील. पृथ्वीचे फक्त खनिज संपत्ती साठीच पूजन होईल. पुरूष व स्त्रिया केवळ विषयलोलूपतेतून लग्न न करताच एकत्र राहतील. कलीयुगाचे वेधक वर्णन देवी पुराणात केलेले आहे. त्यात कथन केले आहे की त्या काळात लोक लोखंडी ताटात जेवतील. स्त्रिया पुरूषी वेष धारण करतील तर पुरूष स्त्रिवेष. तर असे शहरी आधुनिक समाजाचे वर्णन आश्चर्यकारक खरे आहे.

ज्यावेळी पृथ्वीवर दुष्कृत्यांचा (पापांचा) अतिरेक झालेला असेल त्यावेळेस माझे दुसरे अवतरण होईल; असे श्री लॉर्ड जिझस् यांनी घोषीत करून ठेवले आहे. ह्या घटना क्रमाची हिंदू शास्त्रातील कमळाच्या प्रतिका बरोबर तुलना करता येईल. निर्मल असे फूल चिखलातच वाढते तसेच पाप्यांचे संतांमध्ये परिवर्तन ही किमया ईश्वरी कृपेचीच. जरी पौराणिक वाङ्मयात याबद्दल हमी दिलेली असली, तरी या खेळाचा शेवट (अंत) सुखांत होईल अशी आपण खात्री देऊ शकत नाही. प्रथमतः या विश्व नाट्याची कल्पना घेतली तर त्याचे अनाकलनीय शाब्दिक खंडन केलेले दिसते आणि त्यातूनच धार्मिक रूढी उद्भवतात आणि मग परिणामकारक बदलाची प्रणाली आणि आण्विक, मानवी विश्वात्मक पातळीवर होणाऱ्या उत्क्रांतीच्या नियमांची जरूरी दर्शविली जाते. विराटाचे सातवे चक्र पूर्ण उघडण्याची शक्यता व त्यातून घडणारे श्री कल्कीचे आगमन हे अवघड वाटते. म्हणजेच पर्यायी, विश्वाचा अंतीम व पूर्ण विनाश यातून सुचित होतो व ते अटल वाटते. कारण मनुष्य आपल्या अधर्मातून एका रेषेपलीकडे गेला की तो तेथून परत येऊ शकणार नाही. त्यानंतर तो ईश्वराला ओळखणे अगदी अशक्य असेल, व विश्वाच्या निर्मितेचे सर्व नाट्य संपेल आणि अंतीम (तांडव) नृत्यातून तो परमेश्वर आपली सर्व शक्ती ओढून घेईल आणि सर्व विश्वे एका शून्यांत विलय पावतील.

पण तितक्याच खात्रीने प. पू. श्री माताजी निर्मलादेवींनी आम्हांस सांगीतले "आता मला दिसते की ते तांडव हे अनेक सहजयोग्यांच्या निर्मितीने टळले आहे". जर वारा वाहत आहे आणि एक साडी सत्यरूपी झाडाला घट्ट बांधली आणि इतर सर्व साड्या पहिल्या साडीस घट्ट बांधल्या तर त्या उडून जाणार नाहीत. अनेक लोकांना सहजयोगांत आत्मसाक्षात्काराचा लाभ होतो हे पाहून त्यांना (श्री माताजींना) प्रसन्नता वाटते. या आधी मला एवढे काही मिळाले नव्हते. इतीहासांत प्रथमच एवढ्या मोठ्या संख्येने लोक ईश्वरी अवताराचे सत्य ओळखू लागले. यामुळेच असे दिसते की मुक्तीच्या अंतीम टप्प्यात मानवाचा सहभाग हा महत्वाचा आहे. पुन्हा सहजयोग हा श्री कल्कींच्या वर्गीकरणाच्या अगोदरची चाळण क्रिया आहे.

आता सेंट जॉन यांचा श्री कल्कींच्या दृश्याचा संदर्भ पाहू. "मला स्वर्ग उघडल्याचे दिसले आणि सफेद अश्व दिसला आणि त्यावर जो स्वार झालेला आहे तो जणू सत्याचा विश्वासार्हतेचा पुतळाच म्हटले पाहिजे. आपल्या आस्तिकतेतून तो निर्णय घेतो, युध्द करतो. त्याचे डोळे जणू काही अग्नीच्या ज्वालाच आहेत. बरेच मुकुट त्याचे डोक्यावर आहेत. त्याचे नाव कोरलेले आहे ते फक्त त्यालाच माहीत आहे, दुसरे कोणास माहीत नाही. त्यांच्या अंगात रक्ताने माखलेला झगा आहे आणि ज्या



(पुढील मजकूर कव्हर पानावर....)

(कव्हर पानावरून पुढे चालू .....)

नांवाने त्यांना ओळखले जाते तो शब्द म्हणजे "ईश्वराचा शब्द" आणि त्यांचे मागून येणारे त्यांचे स्वर्गीय सैन्य की जे स्वच्छ सफेत लिनन कपड्यात रांगेने पुढे जात आहेत. त्यांचे (श्री कलकीचे) मुखातून तलवारीची पाती बाहेर पडतील, त्याचे प्रहार निरनिराळ्या राष्ट्रांवर होती, व आपल्या लोखंडी दंडाने तो त्याच्यावर राज्य करेल. त्याचे झग्यावर व मांडीवर "राजांचा राजा" व "देवांचा देव" असे कोरलेले असेल."

सेंट जॉन यांचे लक्ष्य प्रथम घोड्याकडे आणि मग कलकीकडे वेधले गेले. या गोष्टीत काही मतितार्थ आहे. पूर्वी जे उघड करून सांगीतले त्याच्याशी या कलकीच्या घोड्याचा संबंध आहे. स्थूल व सूक्ष्म विश्व यातील संबंध आणि विश्वाची उत्क्रांती व मानवी पातळीवरील सूक्ष्म उत्क्रांती, हा विराटामधील सात तत्वावरील कार्यक्रम त्यात समाविष्ट आहे. ही तत्वे प्रत्येक मानवास आत्मसाक्षात्कारासाठी मानसिक व आध्यात्मिक साधने आहेत. आम्ही अगोदरच सांगीतलेले आहे की आत्म साक्षात्कार म्हणजेच सातव्या चक्राचे (सहस्त्राराचे) उमलणे वा उघडणे. वरील घटनांची उकल खालीलप्रमाणे आहे. मानवाच्या सुक्ष्म पातळीवरील सातव्या चक्राचे उघडणे म्हणजे आत्म साक्षात्काराची संकलित क्रिया. हे प्रथमतः मानवात निरनिराळ्या तत्वाचे एकत्रीकरण होय. तसेच मानव व ईश्वर यांच्यातील संयुक्तीकरण किंवा सिमित व असिमित म्हणजेच मर्यादेच्या पलीकडे जाणे होय. सूक्ष्म स्तरावर अनेक मानवांचे सातव्या चक्राचे उघडणे म्हणजेच विराटाचे सातवे चक्र उघडणे.

विश्वाचा उगम व इतिहास यातील संबंध वा ज्ञान व उत्क्रांती यातील दुवा म्हणजेच मानवांचे पुरेशा संख्येने आत्मसाक्षात्काराच्या कक्षेत आपल्या जागृत्तेची पातळी वाढविणाऱ्या कार्यक्रमाचा झालेला प्रारंभ. अगदी शहाणपणाने सांगायचे तर जाणीवेचा घटनाक्रम व इतिहास यांची उत्क्रांती एकत्र मिसळलेली आहे, कारण त्यांची आपापली क्षेत्रे एकत्र आणली गेली ती एका निर्वाणीच्या घटनेच्या येण्याने, ते म्हणजे पवित्र आत्मा अशी देवता प्रतीत करतो की त्यांचे निवासस्थान विराटाचे सातवे चक्र आहे. श्री कलकी उध्दारकही आहे व संहारकही आहे आणि खिश्चन व हिंदु यांच्या मृत्यु व नंतरची शिक्षा या बाबतच्या तत्वरूपी प्रणालीचा सफेद घोडेस्वार आहे. आणि त्याचे आगमन हे सहजयोग्यांच्या सामूहिक जाणिवेत वाढ होण्याने घडणार आहे.

साक्षात्कारी आत्म्यांची सामूहिक जाणीव हाच श्री कलकी यांचा घोडा आहे. आणि पुन्हा मी हेच सांगेन की कृपा करून आपले महत्व ओळखा. साक्षात्कारी लोकांची ही सामुहिक जाणिवेची बांधणी म्हणजेच स्थूलमानाने परत येणाऱ्या राजाचा (वाहनाचा) घोडा तयार ठेवणे. सर्व मानवांच्या सहभागानेच मानव जात वाचवून त्यांना उध्दारण्याचा हा विस्मयकारक कार्यक्रम श्री माताजींच्या योजनेत आहे. या सहभागाशिवाय श्री कलकीचे आगमन होणार नाही. नाही तर श्री सदाशिव हे उठतील आणि आपले विनाशकारी तांडव नृत्य सरू करतील. मग आपल्याला हेच हवे कां ? नाही, आपल्याला परमेश्वराचे राज्य हवे. त्यांचे प्रेम, त्याचा न्याय हवा. आपले ईश्वरी पालक, आपल्यातील ईश्वरी तत्व आम्हाला ओळखायचे आहे. सुवर्ण युग आणायचे आहे. सेंट जॉन यांनी केलेल्या या स्वाराचे वर्णन ऐकून आपण घाबरून गेला असाल, पण दुष्कृत्यांचा (पापांचा) नाश करणारा, हा निरपराध्यांना वाचविणारा आहे. जरी आपण अनेक पापे केली असतील याचा अर्थ आपण पापी झालो असा नाही, आम्हाला चुकीचे मार्गाने नेले, आम्हा गोंधळली. तर आपण हा दुराचार सोडून देऊ. जे दुष्ट आहेत ते माझ्या या इशाऱ्याला हसतील आणि शेवटच्या क्षणापर्यंत पापाचरण करतील.

मूलतः पापी दोन प्रकारचे आहेत, जे प्रथमपासूनच पापी असतात, दुसरे जे पापाकडे नेले जातात. पहिल्या प्रकारचे पार रसातळाला नरकात जातात, दुसऱ्या प्रकारचे सहजयोग्यांमुळे वाचण्याची शक्यता आहे, पण त्यांच्या नाड्या अशक्त असतील, चक्रे पार खराब झालेली असतील आणि अवधान बिघडलेले असेल. ईश्वरी शक्ती वाईटाचा (सैतानी शक्तीचा) नाश करू शकते, पण त्यांची (दुसऱ्या प्रकारच्या पाप्यांची) जागृतताच जर बाधित असेल तर काय करता येईल ?

पण या प्रश्नाचे उत्तर घ्यायचे तर आपण धार्मिकता व पवित्रता यांची कास धरली पाहिजे, आणि आत्मसाक्षात्कार मिळवायला हवा. कोणावरही ही घातकी वावटळ येऊ नये अशी माझी मनोमन इच्छा आहे, मग तो कितीही पापी असो. पण सध्या अशी एक आगळी एकटी व्यक्ती (विभुती) आहे, तिने दिलेला इशारा दुर्लक्षून चालणार नाही. विशेषतः सध्याच्या पोकळ वल्गना व भाकितांनी भरलेल्या आधुनिक जगांत, तुम्ही माझ्या म्हणण्यावर विश्वास ठेवण्याची गरजच काय ? लक्षणे, आश्चर्ये वा चमत्कार कशाला ? फक्त चैतन्य लहरी व जाणीवयुक्त निर्विचारीता मागा आणि या माध्यमातून तुम्हाला अनेक गोष्टींचा उलगडा होईल. दुसरा कोणताच मार्ग कोणालाही खात्रीचा वाटणार नाही. आपण सर्वजण बुध्दाच्या छायेत

यावरत आहोत. जगातील अनेक लोकांना उपासमार सहन करावी लागत आहे. सगळीकडे दुराचार पसरला आहे , हिंसा , अशुध्द वातावरण व त्यातील घातक बदल यांनी जगाला ग्रासले आहे , आणि याकडे सर्व लोक काना-डोळा करत आहेत , व करतील. पण आता आपल्याला अजून संधी दिली आहे की आपण परत त्याच्या (परमेश्वराच्या) राज्यात येऊन त्याचे ऋण फेडू आणि आपण त्याच्या सत्यतेचा शोध घेतला नाही तर आपली अवस्था एका गोष्टीतील पांच बावळ्या वधूप्रमाणे होईल. ज्या आपल्या नवऱ्याची वाट पाहता पाहता त्याला येण्यास उशीर झाल्यामुळे झोपी गेल्या. आणि जेव्हां तो आला तेव्हां त्यांच्या दिव्यातील तेल संपल्यामुळे अंधार झाला त्यामुळे त्या वधू त्या नवऱ्याबरोबर गृहप्रवेश करू शकल्या नाहीत. ज्यावेळी श्री कल्की येतील तेव्हां आपण तयार असायला हवे. "पण तुम्ही मनाशी पक्के करा की अनैतिकता व्यनाधिनता व जगण्यातील चिंता यांनी तुमचे हृदय ग्रासले आहे व असा सगळा फास तुमच्या गळ्याभोवती आहे आणि तुम्ही सतत प्रार्थना करीत आहात की तुमची या सर्व जंजाळातून सुटका होण्यास शक्ती मिळो आणि तुम्ही त्या मानव पुत्रासमोर उभे राहण्यास समर्थ होवो.

ल्यूक २१-३-४

लॉर्ड जिझस् क्राईस्ट अर्थात महाविष्णू यांना श्री शंकराच्या अकरा रूद्र शक्ती प्राप्त आहेत , पण ते एकच क्षमाशक्ती वापरतात. तुम्हांस माहीत आहेच की त्यांनी सक्त ताकीद दिली की पवित्र आत्म्या विरुध्द कोठलेही पाप केले तर त्याबद्दल क्षमा केली जाणार नाही. आणि त्याच क्षणी श्री जिझस् क्षमा करणे थांबवतात , ते कल्की होतात आणि याच टप्प्यापर्यंत आपण स्वतःला सावरून पश्चाताप मानू शकता , क्षमेची याचना करा , स्वतःला सुधारा व शुध्द करा , अगदी वाईटातल्या वाईटाला सुध्दा शेवटची संधी मिळेल. याच धोक्याच्या क्षणाला.

हा चालक संहारक आहे . हे बायबलमध्ये व कल्की पुराणात स्पष्टपणे सांगीतले आहे. ते जेव्हां येतील तेव्हां ते काही बोलणार नाहीत , काही ऐकणार नाहीत , ना वाचविणार , ना क्षमा करणार. आपण स्पष्टपणे समजले पाहिजे की श्री माताजी या आपल्या उध्दारक आहेत. कारण त्या दयाळू आहेत. श्री कल्की येण्याआधीच त्या आपल्याला मुक्ती देणार आहेत. श्री ख्रिस्तांनी आश्वासन दिल्याप्रमाणे त्या आनंद देणाऱ्या आहेत. त्यामुळे आपले संपूर्ण लक्ष त्यांच्यावर हवे आणि त्यांच्या आत्म साक्षात्कार देण्याच्या कार्याकडे. कल्कीची सध्या अपेक्षा करू नका , आपण त्यांच्यासाठी अजून तयार नाही. ते श्री माताजींचे अत्यंत प्रेमळ व आज्ञाधारक पुत्र आहेत. ते फक्त श्री माताजींचे ऐकतात आणि आपले आगमन पुढे ढकलतात कारण आधी आपल्याला आत्म साक्षात्कार घडला पाहिजे.

खरोखर कुंडलिनी आपल्याला दुसरा जन्म देणारी माता आहे , व ती आपली स्वतःची ओळख आहे. तिचे सहजयोगाद्वारे प्रकटीकरण होत आहे. जी श्री माताजींची आपल्याला देणगी आहे. हे नवीन मानवरूप व नवीन जग यांचे मूळ केवळ या मार्सारूपात असणाऱ्या ईश्वरी अवतारात आहे आणि त्या आपल्यातच पूर्ण कृपेत व सत्य रूपात जगाला न समजणारे पण त्याचा उध्दार करणाऱ्या आहेत.

आत्म्याचा दूसरा जन्म , सामुहिकपणे मुक्ती इत्यादीबद्दल खात्री देण्यात आलेली आहे. श्री माताजींचा ईश्वरी संदेश व सत्य यांना आपण सर्व पांचही खंडातील सहजयोगी साक्षी आहोत. आपण सामान्य माणसे पवित्र आत्म्याचे चैतन्य व नवीन जाणीव अनुभवू शकतो.

तुम्ही जर सत्याचे , ईश्वराचे शोध घेणारे आहांत तर आपण या व जरूर ते मिळवा , ते येथेच प्राप्त होईल , आम्ही हात जोडतो , उशीर करू नका.

इतस्ततः भरकटलेल्या बंधु आणि भगीनींनो आपली अवस्था काय आहे ? आपण एका घोटाळ्यात अडकलेले आहांत. ठिक आहे. आपण या सर्व अधार्मिक वृत्तीतून शोध घेत होतो , त्या जंजाळातून बाहेर पडणे सोपे नाही. कदाचीत आपल्याला थोडा त्रास पडेल , पण एक गोष्ट विसरता कामा नये ती म्हणजे श्री माताजींचे ईश्वरी प्रेम हे कोठल्याही पापापेक्षा मोठे आहे. आपण त्यांच्या चरणी आश्रय घेऊ व सुरक्षित राहू. श्री माताजींना समर्पित होण्यामुळे तुमच्या चित्ताच्या लहरी विराटाच्या चित्ताशी जुळतील. श्री कल्की म्हणजे विराटाचे सहस्त्रार , दुसरे काही नसून विराटाच्या चित्ताचे व्यक्तीमत्व आहे आणि अशा रितीने या विराटाच्या अश्वावर आरूढ होण्यास प्रभुत्व प्राप्त कराल.



(सहजयोगी सभासदांसाठी विनामूल्य)